## डॉ. नितीन मोरे

# संधी साधू



# संधी साधू

(दोन अंकी नाटक)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# संधी साधू

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

संधी साधू (दोन अंकी नाटक)

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ सप्टेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे यांची ईसाहित्यसंपदा:

1. चक्रमादित्याचा दरबार १(नाटक)
2. चक्रमादित्याचा दरबार २(नाटक)
3. केल्याने शीर्षासन,
4. नाच जमूरे नाच,
5. अहम ब्रह्मास्मि,
6. मच्छर टाईम्स,
7. संवादोनी प्रकटावे
8. या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )
9. प्रेमातुराणां (नाटक)
10. सांगतो ऐका (एकपात्री)
11. प्रिय पत्रास
12. शिभ्रष्टाचार!
13. आधुनिक कहाण्या
14. अवलोकन..अनुभव..मनोव्यापार
15. राग दरबारी
16. वाळूतल्या रेघा
17. संधी साधू

ही सर्व पुस्तके ई साहित्यच्या वेबसाइटवर

विनामूल्य उपलब्ध आहेत.

www.esahity.com

# डॉ. नितीन मोरे

## डॉ. नितीन मोरे यांच्या पुस्तकांच्या लिंक्स

नाटके

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ragdarabari_nitinmore.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sangato_aika_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramadityacha_darbar__nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramaditya_2_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/prematuranam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ya_kolhatakaranchya_gharat_nitin_more.pdf

विनोदी साहित्य

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/adhunik_kahanya_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/valutil_regha_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bhrashtachar_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/machchhar_times_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/nach_jamure_nach_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aham_brahmasmi_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kelyane_shirshasan_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/samvadoni_prakatave_nitin_more.pdf

इतर

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/letters_nitin_more.pdf


राग दरबारी
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच


डॉ. नितीन मोरे
वाळूतील
रेषा



डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या


डॉ. नितीन मोरे
केल्याने



डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार



डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्रास,



डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
प्रेमातुराणां



डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..
अवलोकन.अनुभव.मनोव्यापार



डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स


डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार
२


डॉ. नितीन मोरे
संवादांनी
प्रकटावे


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो ऐका


डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार

# अर्पणपत्रिका

संधी-साधूंस

सादर अर्पण

# संधी... साधू

# अंक पहिला

## प्रवेश १

*स्थळ: एक होस्टेलची खोली. टेबल, खुर्ची, पलंग. बाकी कॉलेजच्या मुलांची असावी तशी. मकरंद आणि बबन दोघेच आहेत. मकरंद टेबलावर बसून लिहितोय.*

बबन: काय नटनाटकी लेखकराव? झालात का तयार?

मक्या: लेखक? अरे सकाळपासून बसलोय घेऊन कागदांच्या थप्पी.. बघतोय.. मिळेल का मजसी स्फूर्ती.. जी करेल माझ्या भावनांची पूर्ती.. काही झाले ना लिहून की मिळेल जिवास शांती

बबन: शांती.. द्याट्स डिफिकल्ट.. पण बोलावू तिला?

मक्या: ती मानवी शांती नव्हे..

बबन: मग अमानवी शांती?

मक्या: बोल. दिवस तुझे ते बोलायचे.. विचारां वाचून भकायचे..

बबन: छे! तुझ्या कवितेत शोभत नाही असले  शब्द!

मक्या: का? आम्ही असू लाडके.. देवाचे! देवाने सारी सृष्टी निर्माण केली. त्यातील सौंदर्य दाखवायला कवी जन्मास घातले..आणि लेखकसुद्धा..  तेव्हा आम्ही शब्दांचे मालक..

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने.. आम्ही हवे ते शब्द वापरण्यास मुखत्यार .. कारण शब्द हेच आमचे हत्यार! आणि माझ्यासारख्या नटोत्तमासही शब्द हेच हत्यार! पण ते उसने.. लेखक आणि कवीचे शब्द कसे ओरिजीनल.. त्यातून आम्ही काहीही घडवू शकतो

बबन: आणि बिघडवू शकतो.. लेखकराव.. तूच तोडिशी तूच घडविशी! पण असे शब्द तुझ्या कवितेत? भकायचे? तुझी कविता म्हणजे कशी.. तलमातिलम.. नाही तलमातितलम.. नरमातिनरम.. कोमलातिकोलम

मक्या: कोलम? ती कविता काय तांदळाचा प्रकार वाटतो तुला?

बबन: नव्हे.. घसरली जीभ.. त्याबद्दल क्षमा असावी कविराज.. तर गुलाबाच्या पाकळयांहूनही कोमल नि मुलायम शब्दांचे कोंदण घेऊन येणाऱ्या कविता तुझ्या.. त्यात असे विचित्र शब्द बोचतात रे.. त्या कोलम तांदळातल्या खड्यांसारखे!

मक्या: म्हणजे? खडे बोल?

बबन: नाही कविराज.. खडे बोल नव्हे.. खड्यांसारखे बोल..

मक्या: म्हणजे? माझ्यासारख्या लेखकाने बोलोचि नयेत बोल परखड.. म्हणून होते या लेखकाची परवड.. कारे करीशी..

बबन: कालवड? जुळतो ना? म्हण.. होईल का माझ्या गाईस कालवड? की भानगड चालेल?

मक्या (दुर्लक्ष करीत) : बोल बापड्या बोल. दिवस तुझे ते बोलायचे.. पण लक्षात ठेव.. आम्ही असू लाडके! देवाचे! देवाने दिधले जगत हे.. आम्हांस खेळावया!

बबन: खेळ बापडा. हवा तितका वेळ खेळ.. जमवित शब्दांचा मेळ! पण आता तयार हो. आपणास जावयाचे आहे..

मक्या: कोणाचा जावई? कुठे जावयाचे?

बबन: कालच आपण ठरविले.. तुझीच ती कल्पना.. अद्‌भुतरम्य! आणि आज पुसशी.. कुठे? ॐ शांती.. शांती.. शांती:

मक्या: ओह.. शांती! 'अ' नाही.. नुसतीच मानवी शांती! पण मी यावयासच हवे की काय?

बबन: अर्थात! तूच आहेस या नाटकाचा शिल्पकार.. आणि मित्रासाठी इतुके तर करावयास हवेच.. हो की नाही?

मक्या: ठीक.. बा बबन्या.. तुझ्या मैत्रीखातर करितो इतुके.. बघत राहशील तू कवतिके.. आणि कदाचित कुठल्या गोष्टीत मलाही उपयोग होईल या खऱ्याखुऱ्या ॲक्टिंगचा!

बबन: होय.. आणि म्हातारा न इतुका..

मक्या: हे मध्येच काय गड्या? न यमक न रूपक.. न जुळती ते शब्द.. म्हातारा कोण?

बबन: विसरू नकोस.. म्हातारा तपस्वी.. ऋषीमुनी.. संकेत आपला..

मक्या: वा! संकेत! छान!

संकेत विसरेन का

कसा मी..

शोधित मी रहातो फुलांत

तुजला असाकसा मी

बबन: वा! असामी आहेस एक! लवकर तयार हो.. निघावे म्हणतो महाराजांनी.

मक्या: निघावे कशास? कूच करावे! हो की नाही? काय आमचे अश्व तयार आहेत?

बबन: अर्थात महाराज.. आपल्या तुरगांस  खरारा करून नि खोगीरात खोगीरभरती करून तयार केले आहे आम्ही.. आपण फक्त चालावे.. नाही चलावे. परम पावन पदस्पर्शाने पुनीत पायधूळ पायतळी पसरून..

मक्या: पायताण कुठे आमचे.. त्यानेच थोडा प्रहार करतो तुमच्यावर.. प्रहर कोणता.. वेळ वखत कोणता आणि भाषिक प्रयोगाची प्रयोगशाळा उघडून बसलेत सरदार बब्बनराव बोरकर.. बोरकर नाहीत.. तुम्ही तर बोअरकर! आणि बबन नाही.. बबून.. बबून बोअरकर..

बबन: वा! हुशार तुम्ही! पण अडला हरी कोणाचे पाय धरी हे आपणास विदीत आहेच.. तेव्हा.. निघावे.. आपल्या लाथा झाडत! त्या गर्दभाचा आदर्श..

मक्या: खामोश! गर्दभाचा संदर्भ कुण्या विदर्भवासीयांस देत आहेस तू?

बबन: विदर्भ? आणि तू? तू तर नगरचा.. पण कवी आजि पेटला.. अन यमक जुळवू लागला! संदर्भ आणि विदर्भ! वा! खरा गदर्भ.. नाही गर्दभ.. तो संदर्भ असेलही.  पण नाही.. तुजकडे काम माझे.. तुझी नाराजी न परवडणारी.. तेव्हा अमूल बटर लावणे आले. तर अटर्ली बटर्ली अमूला.. अर्थात मकरंदस्वाम्या.. उठा आणि प्रस्थान करा.. कूच करा किंवा नुसतेच निघा! पण निघा! आणि या गरीबाची लाज राखण्यास मदत करा.

मक्या: होय! अडलेल्या नाडलेल्यांस मदत ही आमच्या घराण्यातील रीत.. थोरले महाराज होते तेव्हा दरबारी हा रिवाज पडला..

बबन: एक विनंती आहे.. भूमिकेत असे आणि इतके शिरू नये! कारण ही तुमची भूमिका नाही! विसरू नका.. आणि खरेखुरे आयुष्य हे.. चुलीवरल्या.. कढईतल्या कांदेपोह्यांसारखे!

मक्या: छान.. छानच.. अतीव छान.. फार छान.. फारच छान..

बबन: काय? कांदेपोहे? पण तुझा छानछानाट छानच वाटतो मक्यास्वामी कम महाराज. पण आज तारून न्यावे तारू आमचे

मक्या: काळजी नसावी वत्स.. तुझे ते तुटकेफुटके तारू तारून पैलतीरी तरूतळी नेण्याचा आटोकाट करीन यत्न.. कारण.. हवे तुला ते रत्न!

मी होईन तयार मेरे यार.. मग निघू!

होय! माझी कल्पना.. होईल साकार.. सत्य कल्पिताहून ही स्ट्रेंज असू शकते.. माझ्यातील लेखकास नि नटास आव्हान आहे.. माझ्याच सुपीक डोक्यातील कल्पना साकारणे आहे..

*(आत निघून जातो. बाहेर बबन एकटाच. त्याचा फोन वाजतो. फोनकडे पाहात..) च्यायला फोन. वाज हवा तितका.. ) (आत पाहात..)*

बबन: मक्यास्वामी.. आर्युरेडी? गेटिंग्लेट्यार..!

मक्या (आतून) : डोण्ट बी उतावळा.. येतोय. बाशिंग इज रेडी?

बबन: ऑफकोर्स..

मक्या: वाटलंच.. गुडघ्यास बांध ते!

बबन: बडबडू नकोस.. अडलेला हरी ज्याचे पाय धरतो त्या प्राण्यास स्मरून लवकर ये.. उशीर होतोय. आणि वक्त की पाबंदी यह हमारा दागिना है!

मक्या: दागिना! वाह! वॉट ए हिंदी!

बबन: असू देत. तू मात्र नीट वाग म्हणजे झाले.. नमन नटवरलाल.. सॉरी नटवरा! नटवर्या..

मक्या: आलोच रे.. नटखटा.. आता हा गोष्टीचा प्लॉट कसा फुलतो ते पाहायचे.. चला लेखकराव. नुसतेच दुरून नाही पाहू.. तुम्ही या गोष्टीचा एक भाग आहात.. तर जाणे भाग आहे.. भाग मक्या भाग.. बबनरावांच्या खुशीस कशानीही न जाओ भाग.. भाग मक्या भाग..

## प्रवेश २

*स्थळ: एक छोटा हॉल. वर स्वामी श्री श्री अनिर्बंध स्वामी दरबार अशी पाटी.*

*हॉल छोटाच आहे. एक सिंहासन वजा खुर्ची आहे. बाजूला दोन साध्या खुर्च्या. समोर अगरबत्ती जळतेय. पाठीमागे एक दत्तगुरूंचा फोटो. स्वामी अनिर्बंध आपला फोटो काढू देत नाहीत. त्यामुळे त्यांचा फोटो नाही. किंबहुना स्वामींचे फोटो काढणारा कॅमेराच जळून जातो अशी वदंता आहे. समोर एकुलता एक चुकार भक्त बसलेला. पाठीमागून जै जै अनिर्बंधस्वामी असा जप सुरू असलेली रेकॉर्ड चालू आहे. स्टेजवर दोघांची धावपळ सुरू आहे*

भक्त १: स्वामीजी आज लवकरच येतील म्हणतात

भक्त २: लवकर आणि उशीरा हे कालसापेक्ष शब्द आहेत. त्यामुळे शब्द बापुडे केवळ वारा! पावसाऐवजी पडती गारा! संभाळ पडतील तुझ्या डोक्यावर!

भक्त १: आज महाराजांकडे खास पाहुणे येत आहेत म्हणे.. तुला काय वाटते.. कोण असतील?

भक्त २: भक्तीरंगी तल्लीन झालेल्यास कोणीही येवो काय फरक पडतो?

भक्त १: हे खरंय

भक्त २: आपला हार तयार आहे ना?

भक्त १: अर्थात. येथे आम्ही हार मानत नाही.. याबाबतीत हयगय नाही.

भक्त २: हय आणि गय..! तुझ्या भक्तीहून माझी भक्ती श्रेष्ठ..

भक्त १: ही काय सुपर रिनची जाहिरात आहे? किसीभी टिकियासे ज्यादा सफेद? अनिर्बंधस्वामी अनिर्बंध भक्तीस अनिर्बंध फल देतात.. त्या भक्तीस खोली नाही.. लांबी नाही.. रूंदी नाही.. उंची नाही.. वजन नाही.. मोजमाप नाही..

भक्त २: कळले.

खुर्चीवरील बसलेला माणूस (पुढे येत): अनिरबंद म्हाराज येन्याची येळ झाली का हो?

भक्त १: अर्थात.. आता येतीलच.

माणूस: मग बोलावू माझ्या साह्यबास..?

भक्त १: आता म्हणजे एक मिनिटापासून तीन दिवसांच्या आत.. कधीही प्रकट होतील.. महाराजांच्या घड्याळाच्या काट्याचा काय नेम.. त्यांचा एक दिवसच मुळी अनंत काळ टिकतो.

भक्त २: अगदी सत्य रे तुझे. कोण रे साहेब तुझे?

माणूस: शापूरकरसाहेब.. शापूर आन शापूर उद्योगाचे मालक.

भक्त १: का रे.. पहिले कधी आले नव्हते? माणूस: न्हाई ब्वा. साहेब मोठ्या मुश्किलीत सापडलेत जनू. कायतरी घोटाला हाये.

भक्त २: अरे मोठ्या लोकांना प्रॉब्लेम मोठे..

भक्त १: आणि घोटाळे पण मोठे! (जीभ चावतो) जेवढ्या समस्या मोठ्या.. तेवढे आमच्याच स्वामींकडून काम होणार.. आमच्या स्वामींचा महिमाच असा आहे. इस्ट ऑर वेस्ट.. आमचे स्वामी बेस्ट!

माणूस: आज भक्तांची गर्दी न्हाई जनू..?

भक्त १: तुला ठाऊक नाही.. तुझ्या साहेबासाठीच आज स्वामींचा खास दरबार भरतोय. सामान्य भक्तांना आज प्रवेश नाही. तू नशीबवान.. त्यानिमित्ताने तुला दर्शन मिळेल स्वामींचे

माणूस: व्हय ना. पुन्य म्हना. तर मग मी साह्यबास बलावून घेऊ?

भक्त १: बोलाव की! पण महाराज कधी येतील सांगता येत नाही

माणूस: बोलवतोच..

*(माणूस बाजूला जाऊन फोन करतो..*

*स्टेजवर अंधार.. पाठीमागून एक गाडी थांबल्याचा आवाज. तीन चार माणसं उतरली असावीत. सगळे चालत येत असल्याचा आवाज.. काहीतरी कुजबुजल्याचा आवाज.*

*स्टेजवर प्रकाश. शहापूरकर मोठ्या उद्योगाचे मालक. त्या थाटात चालताहेत. आजूबाजूला दोन जण. त्यांचे चेले असावेत असे.)*

चेला १: साहेब बसून घ्या

चेला २: हो साहेब.. बसा तिथे

(शहापूरकर बसतात.)

चेला २: ( त्या माणसाकडे वळून ) काय रे महाराज आले नाहीत अजून?

माणूस: मला या लोकांनी सांगितले.. म्हाराज कदीबी येतील म्हनून फोन क्येला

चेला २: ( एका भक्तास बोलावत ) या हो जरा इकडे

(दोघे भक्त खाली येतात.)

भक्त १: काय साहेब?

चेला १: महाराज कधी येतील?

भक्त २: आताच संदेश आलाय. येतील..

भक्त १: हो ना..

भक्त २: येतात स्वामीजी..

चेला १: कधी? आमच्या साहेबांना वेळ नाही.. कधी येतील?

भक्त २: ( भक्त १ कडे वळून ) याला ठाऊक.. तू महाराजांचा खास..

भक्त १: हो.. मला ठाऊक आहे.. काय आहे ना.. स्वामीजी सूक्ष्मात गेलेत. त्यामुळे आता थोडावेळ वाट पाहावीच लागेल.

भक्त २: म्हणजे सध्या सूक्ष्मात आहेत?

चेला २: अरे मग दिसतील कसे? की आधीच आले आहेत नि दिसत नाहीत? ( चेला १ कडे वळून ) तरी तुला सांगत होतो भिंग घेऊन जाऊ म्हणजे दिसले असते स्वामीजी

चेला १: पण येतील ते सूक्ष्मरूपात की स्थूल?

चेला २: हो ना! आमचे महाराज साई अर्बुदस्वामी ( गळयातील ताईत डोळयाला लावत ) स्थूलरूपात येतात इतरांसाठी..

चेला १: पण साहेब त्यांचे पट्टशिष्य. त्यांना सूक्ष्म रूपातपण दिसतात! कदाचित आजही ते इथे आले असतील. आपल्याला दिसत नाहीत.

चेला २: खरंय.. साहेबांना विचारू का?

भक्त १: नाही. आमचे स्वामीजी येतील तेव्हा स्थूलस्वरूपात.. येतीलच.. पण स्वामी ध्यानस्थ झाले की त्यांना दिव्यदृष्टीने आसपासचे खास दिसते. त्या सूक्ष्म रूपातून बाहेर येण्यास कधी वेळ लागतो.

चेला १: पण जरा जल्दीने आले तर..

भक्त २: जल्दी? अध्यात्मिक जल्दी? नको तो धोका पत्करायला.. स्वामींचा कोप झाल्याच्या अगणित कथा आहेत. तेव्हा सांभाळून.

चेला १: पण आमच्यावर का कोपावे महाराजांनी?

चेला २: तू नकोस रे चिंता करू. आपले अर्बुदस्वामी पाहून घेतील. तसेही या स्वामींचे एकमेकांशी संधान असेलच.

भक्त २: असेल. पण सांगतो ते ऐका. उगाच नसती परीक्षा पाहू नका. परवा एक तो दुकानवाला घेलाशेट आला. काय गफलत झाली कोणास ठाऊक. इकडून परत जाईपर्यंत इन्कमटॅक्सची धाड.. आता बोला!

भक्त १: आणि ते नौरोजी अंकल. स्वामींच्या प्रवचनात आपल्या मोबाईलमध्य बघत होते.. व्हॉट्सॲप असेल. स्वामी सिंहासनावरून तडक गेले घरी

चेला १: घरी?

भक्त २: म्हणजे धाम.. आपल्या निज..धामी निघून गेले. असे म्हणतात.. जमदग्नीनंतर कोपणारे हे दुसरा स्वामी. जोवर स्वामीकृपा आहे तोवर ठीक. कोपले की..

भक्त १: तोबा तोबा.. खरेतर शिव शिव!

शहापूरकर : काय हो.. स्वामींच्या आगमनास अजून अवधी आहे?

भक्त १: तेच सांगत होतो यांना. सूक्ष्मातून येण्यास कधी विलंब होतो

शहापूरकर : म्हणजे ती सिद्धी प्राप्त झाली आहे महाराजांना? आमचे अर्बुदस्वामी.. त्यांना ही सिद्धी प्राप्त झाली आहे.

भक्त २: होय.. ही अलौकिक सिद्धी प्राप्त झाली आहे. आणि ध्यानधारणेतून स्वामी काहीही पाहू शकतात.

भक्त १: भक्तांच्या गर्दीतही महाराज विसरत नाहीत आपले तपाचारण. अजूनही दिवसातले पंचवीस तास महाराज नामस्मरण..

चेला १: पंधरा की पंचवीस?

भक्त २: योग्य तेच ऐकले आपण. पंचवीस! स्वामींच्या दिवसाला सदोतीस तास असतात

भक्त १: हल्ली.. आधी पस्तीस असायचे.

शहापूरकर : महान पुण्यात्मा आहेत ते. पण आमच्या अर्बुदस्वामींची बात काही और. आमचे स्वामी डायरेक्ट मोबाईलवर बोलतात विष्णू नाहीतर शंकर भगवान यांच्याशी. हॉट लाईन!

चेला १: हे महात्मे आपापल्या परीने महान आहेत.. आपण य:कश्चित नादान..

*(शहापूरकरांच्या तोंडावरची नाराजी त्या य:कश्चित नादान मध्ये त्यांनाही सामील केल्यामुळे लपत नाही. पण नाईलाजाने आपला चेहरा साधासरळ ठेवतात ते. विषय बदलावा म्हणून म्हणतात..)*

शहापूरकर: पण बघा ना स्वामी कुठवर आलेत?

भक्त १: केला असता फोन.. पण महाराज रागावले तर? त्यांचा कोप वाईट..

भक्त २: हो ना! फट म्हणता ब्रह्महत्या व्हायची..

*(शहापूरकर घड्याळाच्या काट्यांकडे निरखून पाहतात.)*

शहापूरकर: एवढे कोपिष्ट आहेत अनिर्बंधस्वामी?

भक्त २: होय तर जमदग्नी नंतर यांची पाळी. आम्हीच जीव सांभाळून असतो.

भक्त १: पण त्यांच्या कृपादृष्टीने हा भवसागर पार करणे शक्य होते.. त्यापुढे त्यांच्या कोपाची तमा..

भक्त २: त्यांना क्रोध होऊ नये इतके पहावे म्हणजे झाले!

*(शहापूरकरांचा मोबाईल वाजतो तेवढ्यात.)*

शहापूरकर( मोबाईलवर ): जय स्वामीजी .. अं.. हो.. कळलं.. स्वामीजींचा विजय असो. नाही नाही.. करतो तसे.. काय? अस्सं? असं म्हणतात स्वामी? ठीक.. निघतो.. हो.. हो.. नाही.. तडक.. पण .. शीघ्रकोपी आहेत हे.. काय?.. बरे.. स्वामींच्या आज्ञेबाहेर नाही आपण.. निघतो..

शहापूरकर ( भक्तगणांस ): आमच्या गुरूची आज्ञा आहे.. आम्ही तडक निघून यावे. राहूकाळ आहे.. त्यात नवीन भेटी नकोत.. आम्ही निघतो.. नव्हे.. आम्हाला निघावेच लागेल..

भक्त १: असे नका करू साहेब.. परत महाराज कसे येतील.. हे सारे परत कसे अरेंज..

भक्त २ ( त्याला चिमटा काढत गप्प करत ): साहेब स्वामींच्या कोपाची भीती..

शहापूरकर: ते काही असो. आम्ही गुरू आज्ञेबाहेर नाही.. चला रे..स्वामींच्या कोपाच्या कथा ऐकल्या.. परत न येणे श्रेयस्कर.. अर्बुदस्वामींना घालू साकडे..

*(साहेब, त्यांचे दोघे चेले आणि तो माणूस झटक्यात निघून जातात.)*

भक्त २: च्यायला. ह्या लोकांना लवकर यायला काय होते.. स्वामी म्हणे.. इकडे किल्ला किती लढवावा आपण..आपल्या तलवारी गंजून जातील पण यांचा नाही पत्ता

भक्त १: बबन येणार आहे.. पण तो स्वामी कोण?

भक्त २: कोणास ठाऊक. असेल त्याचाच कुणी मित्र. बबन्याची कमाल आहे यार

भक्त १: कमाल तर खरीच. आपण पण त्याच्यासाठी तयार झालोच ना?

भक्त २: खरंय..

*(त्याचा मोबाईल वाजतो)*

भक्त २ ( फोनवर ): या.. तुमचीच पाहतोय.. वाट.. आहे इकडे आमची.. वाट.. लवकर या.. नाही.. उशीर कसला.. लवकरच आहे अगदी.. हो.. आरती बाकी आहे.. तुमची.. ती करतो!

*(फोन ठेवतो)*

भक्त १: चल काढू सारे.. तरी बरे हॉल तुझ्या बापाचा..

भक्त २: झाले ते पुरे झाले.. आपणही निघू..त्या दोघांना बघून घेऊ देत..

भक्त १: मला एक डाऊट आहे यार.. त्या लोकांचा तो अर्बुदस्वामी पण असाच नकली नसेल ना?

भक्त २: नकली साधुंचे दोन प्रकार पडतील.. ऐक.. आपल्या अनिर्बंधस्वामीसारखे.. जो आपल्याला ठाऊक आहे की नकली आहे.. आणि दुसरा.. बाकी बुवा आणि बाबा.. जे देवाचे नकली एजंट.. भक्तांना संशय ही येत नाही.. असले.. असली नकली!

भक्त १: खोलात अभ्यास केलाय दिसतो

भक्त २: काय करणार.. काल बबनने भरीस घातले ना.. रात्रभर झोप आली नाही.. नेमके पोलिसबिलिस .. धाडबिड काही.. चला तो शहापुऱ्या गेला.. बला टळली..

*(अनिर्बंधस्वामी आणि त्यांच्याबरोबर बबन प्रवेश करतात..*

*आत येता येता)*

बबन : अनिर्बंध महाराजांचा विजय असो..

भक्त १ आणि २: विजय असो!

*(स्वामी येऊन आसनस्थ होतात.)*

बबन: आली का पार्टी कुश्या?

भक्त १ ऊर्फ कुश्या: आपल्या नजरेस दिसते तेच..

*(दोघे आजूबाजूला बघतात..)*

स्वामी: म्हणजे आपण वेळेत पोहोचलो बबन्या..

भक्त २ ऊर्फ चिन्या: अगदीच! अगदी वेळेत!

बबन: या लोकांना वेळेची किंमत नाही.. टाईम इज मनी

कुश्या: म्यांव!

स्वामी: उगाच घाई केलीस बबन्या.. शहपूरकराचा पत्ता नाही..

बबन: हो ना..

चिन्या: स्वामींनी क्रोधित होऊ नये..

कुश्या: आणि बबन्या.. तू ही

बबन: मी कधीच रागावत नाही.. आणि अनिर्बंधस्वामी म्हणजे साक्षात बर्फ.. थंडगार! कधी राग नाही की घुस्सा नाही.. चिन्या: हो ना! फक्त कोप! नेक्स्ट टू जमदग्नी!

बबन: छे रे!

कुश्या: दिसेलच!

बबन: फोन कर चिन्या.. साहेबास म्हणावे.. महाराजांना टायम नाय.. समाधिस्थ होणार आता.. तेव्हा कृपादृष्टी हवी असल्यास..

चिन्या: कृपादृष्टी!

कुश्या: मला वाटते.. तुम्ही अजून थोडा विलंब केला असतात तर..

बबन: नाही.. नाही.. बोलवा शहापूरकरास.. स्वामी इज टू बिझी

कुश्या: तसे नाही.. थोडा उशीर केला असतात तर आम्हीही गेलो असतो..

चिन्या: अर्बुदस्वामी शरण!

कुश्या: शहापूरकरासोबत!

बबन: म्हणजे रे? शहापुऱ्या येऊन ..

चिन्या: गेला!

कुश्या: आणि आता परत न येणे.. कारण या चिन्याने या स्वामीच्या कोपाच्या काय काय कहाण्या कथन केल्यात की..

चिन्या: मग काय करणार.. आपापल्या स्वामीची वट आपणच वाढवावी लागते!

अनिर्बंध: च्यायला.. सारे काही ओव्हर? मग ही दाढी.. कशाला हवी आता..

*(दाढी काढून टाकतो. डोक्यावरच्या जटांचा टोप ही.)*

चिन्या: आयला तू?

कुश्या: हा बरा सापडला बबन्या तुला..

बबन: सापडला.. आता? याचीच आयडिया ही.. आता सारेच मुसळ केरात. मक्यास्वामी हे काय?

कुश्या: मक्या.. लवकर आला असतास तर.. त्या साह्यबाचा अर्बुदस्वामी.. आता तो..

बबन: बाप रे! आता रे? परत हा हॉल नि सारा इंतजाम

कुश्या: परत..?

मक्या: परत? मी नाही येत परत..

कुश्या: आणि शहापुरकर? परत कसला येतोय तो साहेब.. घाबरवून टाकला पार या चिन्यानी..

बबन: काय गरज होती असे घाबरवायची?

चिन्या: हे चांगलेय.. तुला मदत करायला गेलो नि तू आमच्यावरच डाफरतोयस

बबन: सॉरी यार.. पण टेन्शन..

चिन्या: ठीक.. जा माफ.. पण बबन्या तुझे नेमके काम काय होते?

मक्या: काम? ॐ शांती शांती शांती:

आणि काय?

बबन: तुम्ही बरे मजेत बसलात इथे.. मला झोप यायची नाय..

कुश्या: ते तू बघ.. हे सारे आवरून ठेवा.. आणि चिन्या भाडं घे याच्याकडून हॉलचे..

चिन्या: घेतो ना.. परत या नाटकात रोल.. त्याची नाईट..

बबन: बस क्या हीच काय दोस्ती?

मक्या: बबन्या दोस्ती नाय.. मस्ती! आणि उठाठेव नसती!

बबन: बोला बाबांनो.. तुमचेच दिवस आहेत..

कुश्या: मी सांगतो काय लफडे आहे ते.. शांती नावाची कुणी शहापूरकराची सुबक ठेंगणी असणार.. तिचा खवीस बापूस म्हणजे तो अर्बुदस्वामीचा शिष्य शहाजोग शहापूरवाला आडवा जात असणार.. मग त्या स्वामीभक्त बापास पटवायला हा नकली स्वामी!

मक्या: वा! डिटेक्टिव्ह..

चिन्या: आयला.. खरेच की काय? सॉलिड डोक्यालिटी यार.. वे टू गर्ल्स हार्ट थ्रू बापूस.. व्हॉट अॅन आयडिया सरजी

बबन: चुप बसा रे.. मक्या.. डिटेक्टिव्ह नाही.. डिफेक्टीव्ह म्हण!

मक्या: ॐ शांती शांती शांती:

## प्रवेश ३

*स्थळ: तीच होस्टेलची खोली. मक्या, बबन आणि कुश्या आहेत.*

कुश्या: केवढ्याला पडले रे हे सारे..?

मक्या: सांगू.. आईच्या गावात.. बाराच्या भावात! पण मी ते आयटम्स केले काल परत.. मगनलाल ड्रेसवाल्याला!

बबन: कशाला? ठेवले असतेस. अजून एकदा ट्राय केले तर..

मक्या: पाहिलंत कुशाभाऊ.. आशा अमर असते!

कुश्या: ही आशा कोण? आणि अमर कोण?

बबन: अरे.. द वन्स हूज बर्न्स ओन्ली अंडरस्टॅंड्स.. जिसका जलता है उसकोच  कलता है..

कुश्या: मक्या.. बोलाव रे आगीचा बंब! आग लागलीय..

मक्या: जाऊ देत.. अरे ड्रेस मिळतात भाड्याने.. चोवीस तासांसाठी. तुझ्यासाठी काय रोज भाडे भरू?

कुश्या: नाहीतर आयडिया.. मक्या तूच लांबलचक दाढी अन जटा वाढव.. मग ड्रेसवाला कशाला? यंग ॲंड हॅंडसम महाराज..

बबन: यंग ठीक.. पण हॅंडसम कोण? हा? आणि तुमची भंकस बस. प्रसंग काय.. बोलता काय? हा काय खरा साधू?

मक्या: ॐ भवति.. भिक्षां देही..

बबन: वा! थॅंक्स.. व्हॉट ॲन आयडियाची कल्पना! उद्या जाऊ..

मक्या: कुठे?

बबन: शहापूरच्या शहाकडे! त्या सुलतानाकडे. तू आणि मी. तू प्रमुख स्वामी.. मी डेप्युटी स्वामी. शहापुऱ्याच्या घरी जाऊ.. तू तुझी भविष्यवाणी वर्तव.. सांग, त्याचा उद्धार होईल फक्त ब नावाच्या तरूणाकडून!

मक्या: ब बोले तो?

बबन: अर्थात बबन!

मक्या: का? ब म्हणजे बहादूर.. ब म्हणजे बदकचंद.. ब म्हणजे.. बदामलाल.. ब म्हणजे.. बुलककुमार.. ब म्हणजे बावळटचंद्र..

बबन: वा! ब वरून नावं सुचेना झालीत..? कुश्या: सांग.. तीन अक्षरी.. ब ने सुरू.. न ने संपणारे.. ब डॅश न असा तरूण तुझा उद्धार करेल!

मक्या: वा! त्या शहापूरकराचे घर कुठल्या चाळीत आहे?

कुश्या: चाळीत? बंगला असणार मोठा

बबन: अर्थातच..

कुश्या: मग त्याच्यापर्यंत पोहोचणार कसा?

मक्या: आणि त्याच्या बंगल्याबाहेर मोठे गेट.. बंदूकधारी सिक्युरिटी.. आणि चारपाच शिकारी कुत्री असणार.. बुलडॉग नाहीतर अल्सेशियन..

कुश्या: आय नो.. अल्सेशियन्स ऑल्सो बार्क!

मक्या: पॉईंट तो नाही. कुत्ता भुंकता है तो भुंकने दे! उसका वो धर्म है.. उसका वो कर्म है.. पण.. मेरा ये वर्म है.. चार ओळी ऐका..

त्याच्या तटबंदीला भेदून पोहोचशील रे कसा तू?

अन काळजास भेदून त्याच्या जाशील रे कसा तू?

एकेका क्षणी तू जाशी येथे बावरून तू असा रे?

घेऊ तुला कितीही ते सावरून मी कसा रे?

कुश्या: वा! वा! पण हे बघ.. नाऊ आय गेस.. मी सांगतो काय लफडे असणार ते.. आधी म्हणालो ना तेच.. शांती नावाची कुणी शहापूरकराची शहाणी सुबक ठेंगणी असणार.. तिचा खवीस बापूस म्हणजे तो अर्बुदस्वामीचा शिष्य शहाजोग शहापूरवाला शहा शहामृगासारखा आडवा जात असणार.. मग त्या स्वामीभक्त बापास पटवायला हा नकली स्वामी!

मक्या: वा! डिटेक्टिव्ह.. परत परत तोच तपास?

कुश्या: सॉलिड डोक्यालिटी यार.. वे टू गर्ल्स हार्ट थ्रू बापूस.. व्हॉट ॲन आयडिया सरजी!

मक्या: परत तेच! पण गर्ल्स हार्ट नाही.. ते झालेय.. ऑलरेडी कॉंकर्ड! आता हॅंड!

कुश्या: म्हणजे ये हाथ मुझे देदे शापूर?

बबन: चुप बसा रे.. मक्या.. डिटेक्टिव्ह नाही.. डिफेक्टीव्ह म्हण!

मक्या: ॐ शांती शांती शांती:

कुश्या: डिफेक्टीव्ह का? ते तुम्ही उशीरा आलात म्हणून. नाहीतर आजच झाले असते.. मला वाटतेय तुम्ही त्या शहापुरग्रहाचीच शांती करा..

बबन: आता एकच उपाय.. लेखकराव.. कहानी में ट्विस्ट! तू आणि मी.. बनून साधू संधी साधू!

मक्या: म्हणजे दोन ड्रेसचे भाडे!

पण देशील तू .. जर अडतेय इथे गाडे? पण आता वे टू हार्ट पेक्षा वे टू बंगला शोधून काढ.. मग पुढे!

कुश्या: आणि फिकर नॉट.. कुत्रा चावला की इंजेक्षन मोफत मिळते.. म्युनिसिपाल्टीत.. सेम फॉर लॅब्रॅडॉर.. बुलडॉग अ‍ॅंड ऑल्सो सेम फोर अल्सेशियन! आणि सेम फॉर रस्त्यावरील कुलुंगी आणि नोमॅडिक कुत्रा.. म्हणजे पैशाचा प्रश्न नाही! आणि हल्ली म्हणे चौदा नाहीत.. पाच बास! सो.. गो अहेड!

बबन: उडव माझ्या मजाकचा पतंग.. आणि करा मला तंग..

मक्या: म्हणजे उठतील तुझ्या दिलातून खास तरंग! मायक्रोव्हेव्स!

कुश्या: एवढे सारे झाले पण त्या शांतीबाईंबद्दल कोणीच काही बोलत नाही.. म्हणजे वैनीबाय कशी काय..

मक्या: कुश्या, डायरेक्ट लग्नाच्या स्टेजवर भेटू तिला! तोवर हीच आपली.. फुकटची हमाली!

बबन: टोचा.. टोचे लोक तुम्ही. पण माझे आता एकच लक्ष्य.. शहापुरी बंगला! नाय घातला ना कुत्र्याला धोबीपछाड तर हा नाव लावणार नाही.. कुश्या!

मक्या: कुश्या.. काढ उठाबश्या.. धू कपबश्या.. कश्याबश्या..

कुश्या: व्हाय मीच?

मक्या: अरे याचा कॉन्फिडन्स पाहिलास? फुल्टू यार..

बबन: तुझ्यामुळे.. उशीर जाहला. किती वेळ तयारीला?

मक्या: किती वेळ काय? दाढी चिकटत नव्हती! पण गोष्ट आता पुढे सरकवलीच पाहिजे.. तर आता नुसती दोरीवाली आणू.. दाढी

बबन: वॉव! तर तुला प्लॅन पसंत आहे आणि तू येण्यास तयार आहेस! थँक्यू.. तू ती असतास तर मुका घेतला असता..

कुश्या: पण नाही.. आता मुला.. मुका नाही.. मुकाट बस!

मुक्या: मुकाट कसला.. हा मोकाट सुटेल आता.. मुकाट्याने मोकाट!

बबन: होय सुटेन मी मोकाट..

मक्या: बोंबलू नकोस.. लाथ घालेन इन पेकाट!

कुश्या: शीघ्र कवी! वा!

बबन: तुम्ही लोक वेळ वाया दवडता.. तोंडची वाफ व्यर्थ दवडता.. या वाफेवर रेल्वेचे अख्खे इंजिन चालू शकेल.. ते राहू देत.. गाईज लिसन

कुश्या: बोल बैला..

बबन: तुझ्या बैलाला ढोल.. डोण्ट ट्राय माय पेशन्स! आता शांती..

मक्या: तेच तर! तिच्याच साठी सारा अट्टाहास आणि आटापिटा.. आणि यातायात..

कुश्या: कवायात चालेल?

बबन: कवायात.. वाह्यात माणसा.. चालेल. आम्हाला तीच करायची आहे!

मक्या: दॅट कॉल्स फॉर डिटेल प्लॅनिंग यार. कदम ताल.. माहिती काढ. शत्रूवर हल्ला चढवायला कोणती वेळ योग्य.. बघ गनीम घरात असलाही पाहिजे आणि आपल्याला भेटला ही पाहिजे! दोन ओळी ऐका..

महफिल में उसके जाएंगे हम बडे आबरू से..

खुदा टेक केअर द्याट न आएं वापस हम बडे बेआबरू होकर!

बबन: वा! छान सिंह! म्हणजे शेर! तर आज प्लॅन बनवू.. फील्डिंग लावू आणि गळात पकडू मासा!

कुश्या: ही नवीन पद्धत वाटतेय.. मासेमारीची! चालू द्यात.. यातही गंमत आहे.. हे माझे मत आहे..

मक्या: कारण तू मतवाला आहेस!

बबन: देवा! असले कसले रे दिलेस मला दोस्त.. यांना परिस्थितीचे गांभीर्य नाही.. कसला पोच नाही.. कसले रे हे दोस्त..

मक्या: अरे हे तर देवाने दिधले.. दिवाळीचे पोस्त!

कुश्या: तर गाईज.. रादर बैलाज.. मी निघतो.. तुम्ही चालू द्यात प्लॅनिंग.. बाय!

*(कुश्या निघून जातो.*

*दोघे एकमेकांशी गप्पा मारत बसतात. प्रकाश हळूहळू मंदावत जातो.*

## प्रवेश ४

*स्थळ: तीच खोली.*

*चौघे म्हणजे बबन आणि मक्या आहेत. बरोबर चिन्या आणि कुश्या पण आहेत. बबनच्या पायावर बॅंडेज तर मक्याच्या दोन्ही गुडघ्यांवर पट्ट्या बांधलेल्या आहेत. एक पट्टी कपाळावर.*

कुश्या: दुखतंय का रे फार?

चिन्या: दुखतंय? अरे जो दर्द उसने दिया उससे कई गुना कम..

कुश्या: और अब आएंगे वो जरूर लगाने मरहम

मक्या: मरहम नाही.. मरहूम होता होता वाचलो आम्ही..

कुश्या: काय रे कुत्री मागे लागलीत म्हणजे नक्की काय झाले?

चिन्या: तू काहीही विचारतोस कुश्या! कुत्रे मागे लागते तसेच हे पण. फक्त अनेकवचनी! पण एक चांगलेय.. चावले नाहीत.

कुश्या: तसे शहापूरकराचे कुत्रे अहिंसक असणार.. भुंकतात ते चावत नाहीत..

चिन्या: आय नो.. डॉग्स दॅट बार्क डोण्ट बाईट!

कुश्या: अर्थात गरजेल तो पडेल काय! आपण पण जायला हवे होते यार. दुरून तरी गंमत पाहिली असती ना. पण दोघांच्या पैकी कोण जास्त फास्ट आहे.. स्वामी की डेप्युटी?

मक्या: हार्टलेस दोघे.. इथे आमचा जीव जायची पाळी होती. आणि तुम्ही..

कुश्या: तुझे खरेच.. या बबन्याला काय.. प्रेयसीच्या कुत्र्याचा चावा गोड म्हणतात.. पण तुझे काय.. बेगानी शादी में..

चिन्या: पण मला एक कळत नाही.. या सर्वात आपल्या नाटकातली नायिका अगदी गप्प आहे. तिचा काहीच रोल नाही? म्हणजे ती आहे ना खरेच? की नुसतीच खयालोंकी मलिका? तिने एकाही शब्दाने अजून विचारू नये?

कुश्या: तुला काय ठाऊक.. तिने केलीही असेल चौकशी.. ती काय तुला सांगून करेल?

मक्या: आता तू बबन्या आणि तुझी ती शांती. कितीही अशांतता माजवलीस तरी.. नो मोअर रोल प्लेईंग. झाले तितके नाटक पुरे. अरे आम्ही गेलो बंगल्यावर. मी अंगदानंद स्वामी आणि हा डेप्युटी.. शिलानंद..

कुश्या: म्हणजे दगड! कुठून एवढे योग्य नाव शोधून काढलेस? बरं मग पुढे काय झाले?

मक्या: काय होणार? अरे, तरी याने शांतीला फोन करून सांगितले होते.

बबन: ती तरी काय करणार? ती म्हणाली होती.. येऊ नकोस. त्यांच्याकडचा धर्मेंद्र अगदी अनमॅनेजेबल आहे म्हणून.

कुश्या: धर्मेंद्र?

मक्या: कुत्र्याचे नाव रे. शहापूरकराचा आवडता नट.. धर्मेंद्र.. म्हणून सर्वात लाडक्या कुत्र्याचे नाव.. धर्मेंद्र!

चिन्या: मग बाकीचे कोण? राज कपूर? की गोविंदा? आणि नेमका अंगावर कोण आला? कौन रे जो आंगपर आया.. कौन रे वो आकर के चाव्या..

मक्या: तो कोण अंगावर आला.. कसा ओळखणार. एकेक कुत्रा असा..

कुश्या: धिप्पाड?

बबन: माझ्या मागे लागला तो धर्मेंद्र..

कुश्या: आयला! म्हणजे तू हेमा?

चिन्या: हे मां!

मक्या: तर हे चार खूंखार अतिरेकी श्वानवर्गीय राक्षस आमच्या अंगावर आले. तुला ठाऊक नसेल.. ते कुत्रे त्या सिक्युरिटीवाल्यांना पण आवरत नाहीत.

चिन्या: कठीण आहे..आता हे जावईबापू सासरी कसे जातील? धर्मेंद्र त्याला सासुरवास करेल

मक्या: हुं.. पण त्याला आत शिरू दिले तर ना? जावई पाठच्यापाठी पळून जाईल!

चिन्या: तुम्ही विसरताहात एक गोष्ट.. त्याआधी जावईकरण होणे गरजेचे..

( बबन त्याच्याकडे अशा नजरेने बघतो की चिन्या एकदम 'सॉरी.. सॉरी' बोलतो )

बबन: दुष्ट आहात सारे. इथे माझे काय हाल झाले ते नाही बघत..

कुश्या: ते बघूनच सांगतोय

चिन्या: मी तर अरेंजड मॅरेजच करणार.. सासरी कुत्रा.. हत्ती.. वाघ.. सिंह .. झालंच तर पाली, झुरळं.. साप .. अजगर.. नाहीत हे पाहून मगच!

मक्या: छान! मुलगी असल्याचे पाहूच नका.. प्राणी नसल्याचे पाहून करा लग्न!

बबन: तुम्हाला मजा सुचते इथे मी व्याकुळतेने तडपतोय.. काय करावे मी?

अरे काय झाले होते माहित नाही तुम्हाला.. सांगतो.. शहापूरकरांचा उद्योगधंदा मोठा. शांती मोठ्या श्रीमंत बापाची लेक

कुश्या: बिघडलेली?

चिन्या: आता तू काहीही बोलतोस..

कुश्या: सॉरी.. पण अमीर बापकी बिगडी औलाद ही स्टँडर्ड फ्रेज आहे आपल्याकडे

बबन: असेल पण शाल्मली तशी नाही.. तर शाल्मलीने घरी सांगितले माझ्या बद्दल..

मक्या: हू इज धिस नवीन पात्र?

बबन: शांती.. तिचे खरे नाव आहे ते. तिचे नाव शांती का पडले याची कहाणी आहे.. पण आजचा विषय तो नाही.. तेव्हा.. तर शहापूर म्हणे.. मी तुझ्या.. म्हणजे माझ्या.. म्हणजे शहापूर म्हणे.. शाल्मली शहापूरकरच्या म्हणजे खरंतर शांताराम शहापूरकरच्या पैशांकडे पाहून तो.. म्हणजे मी.. असे तिच्या म्हणजे शाल्मलीच्या ह्याच्यात.. म्हणजे.. प्रेमात पडलो नाही कशावरून?

मक्या: काय कॉम्प्लिकेटेड आहे रे.. पण आय टेल यू व्हॉटीज धिस.. तर शहापूरकर म्हणाले की शांतीच्या बापाकडचा पैसा पाहून बबनने तिला पटवले नाही हे कशावरून? बरोबर ना बबन्या?

बबन: हां.. खरेय हेच म्हणायचे होते मला! मला काही सुचत नाहीए.. देअर इज नो लाईट अ‍ॅट द एंड ऑफ टनेल..

कुश्या: टनेल नसेल तर फनेल वापर.. पण तुझे ते शांतीपुराण अर्धवटच झालेय..

बबन: तर बापाने मुलीस सांगितले.. सिद्ध कर की ते तसे नाही..

चिन्या: मग?

बबन: ते तसे नाही.. मला ठाऊक आहे.. पण सिद्ध कसे करावे? हनुमानाने छाती फाडून दाखवली होती.. तशी फॅसिलिटी आपल्याला नाही..

कुश्या: मग?

बबन: शहापूरकर इज देवभक्त.. साधू आणि महाराजांच्याकडे ओढा त्यांचा.. हे शाल्मलीने सांगितलेले.. म्हटले त्याचा उपयोग करून घेऊ.. या स्वामींनीच सांगितले तर..

चिन्या: मग? आणि तुला कधी शहापूरकरांनी पाहिले नाहीये?

बबन: नाही..

चिन्या: पण तू या अनिर्बंधस्वामी बरोबर असाच आला होतास.. पुढे मागे तर सासरेबुवांना ही ओळख पटली असतीच ना?

मक्या: आयला हो रे.. आपल्या लक्षात नाही आले..

बबन: हुं.. इन अ वे ते झाले ते बरेच.. तर दुसरा प्रयत्नही श्वानकृपेने फसला. माझी दाढी पडली त्या धर्मेंद्रपासून पळताना.. पण कुणाला नाही कळले.. आता पुढे काय? हौ टू बेल द कॅट?

कुश्या: क्याट.. की डॉग? कुत्र्याच्या गळयात बांध ती! बेल द क्याट नाही.. हाऊ टू बेल्ट द डॉग म्हणा! त्याशिवाय तुला त्या कुत्रासदनात प्रवेश नाही! आता हे फॅन्सी ड्रेसवाले प्रकरण ठेवून देऊ बाजूला. नवीन काही विचार करू.

चिन्या: विचार? मग तू हो बाजूला.. तिथे तुझे काय काम?

कुश्या: वा! काही जणांना आपण खूप छान ज्योक मारतो असे वाटते.. पण साधा उंदीर न मारणारे.. ज्योक कसला मारतील?

बबन: तुमचे ते उपकथानक राहू देत बाजूला. पहिले ते शांती प्रकरण!

मक्या: ॐ शांती शांती शांती:

कुश्या: तू म्हणतोस तसे.. शांतीसाठी अशांती माजवू नकोस. काही न काही मार्ग दिसेलच..जहां चाह वहां राह.. म्हणजे जिथे चहा तिथे रस्ता!

चिन्या: चहापान आणि कांदेपोहे! छान. आधी कुत्र्यांना आवरा. दत्तगुरूंचे चार कुत्रे!

मक्या: आपण थोडे दिवस जाऊ देऊ.. त्याच दत्तगुरूंच्या कृपेने आयडिया आपोआप सुचेल.

बबन: शक्य नाही रे..

चिन्या: अरे जगी अशक्य असे काय आहे..

कुश्या: शेक्सपियर सांगून गेलाय..

चिन्या: नेपोलियन.. नॉट शेक्सपियर

कुश्या: तेच ते.. नावात काय आहे?

बबन: ते बोलण्यापुरते ठीक.. अरे ग्लुकोज बिस्किट खाल्लेस ना तू चहाबरोबर?

मक्या: त्याचे काय?

बबन: जगात एक माणूस दाखवून दे.. ज्याचे ते बिस्किट चहात डुबून त्याचा एकदातरी लगदा झाला नाही! तर आता टेन्शन.. झोप येणार नाही मला..

मक्या: चार ओळी आहेत.. ऐकवू..

कुश्या: नाही म्हणालो तर ऐकवणार नाहीस का?

मक्या: नाही.. ऐकावे तर लागेलच..

तुझ्या आठवणीतली सरती दिवसांमागून दिवस

सरता न सरते ती निशा..

तुला भेटण्याच्या काट्याकुट्यांनी भरलेला मार्ग

शोधता शोधता चुकतो मी दिशा!

चिन्या:

करत बसलो विचार तुझा विसरून सारे कसे

की बघता बघता वाढल्या दाढी अन मिश्या!

कुश्या: वाह! वाह!

एकेक नग मित्र आमुचे म्हणतो हा कुश्या!

बबन: असो.. मित्रांनो तुमच्या या मुशायऱ्याबद्दल धन्यवाद. आजवर आपण एकत्र मोहिमा चालवल्या.. तडीस नेल्या. आठवा ती मोहिम जिच्यात याच.. याच चिन्याने चिनी भाषेत चिनी मातीच्या भांड्यावर चिन चिन चू लिहिले होते.. त्यासाठी आपल्याला मिळालेले ते बक्षीस.. नि ती रायगडावरील मोहीम.. किल्ले रायगड सर केलेला मी आणि माझ्या मावळयांनी.. म्हणजे तुम्ही.. अशा किती आठवाव्यात मोहिमा आणि..

कुश्या: तू काय सेंड ऑफ चे भाषण करतोयस?

बबन: पथ में बिखरे कांटे..

मक्या: मारीन पाठीत धपाटे..

अजून गेला नाही रंग आपल्या दोस्तीचा.. क्षण आणि क्षण आठवे आपल्या मस्तीचा

कुश्या: आणि आता शापूरजीशी कुस्तीचा! मर्दानी मावळा तू..

चिन्या: खरंय.. बचेंगे तो और भी लडेंगे!

बबन: बचेंगे तो ना! मला सगळीकडे अंध:कार दिसतो.. माझ्या मनमस्तिष्कात खळबळ होतेय..

मक्या: चूप रे.. शेंदाड शिपाया.. अनिर्बंध आणि कोण ते अडगानंद स्वामी म्हणतात.. वत्स.. हर कुत्ते के दिन आते हैं.. तो एक दिन तुम्हारा भी होगा! धर्मेंद्र.. जीतेंद्र.. राजेंद्र.. और तुम बबनेंद्र!

बबन: चुप रे.. पण तू म्हणतोस तेच खरे.. अपने भी आएंगे दिन एक दिन..

मक्या: मन में है विश्वास.. पूरा है विश्वास.. कुश्या: होंगे कुत्ते चारों ओर.. होंगे कुत्ते चारों ओर.. एक दिन .. मन में है विश्वास.. पूरा है विश्वास

चिन्या: हम भौकेंगे जोरसे.. हम भौकेंगे जोरसे.. एक दिन.. मन में है विश्वास.. पूरा है विश्वास..

कुश्या: होगा शापूर गुपचाप.. होगा शापूर गुपचाप.. एक दिन.. मन में है विश्वास.. पूरा है विश्वास..

चिन्या: होगी शांती चारों ओर.. नाही.. होगी शांती बबन के घर.. होगी शांती बबन के घर.. एक दिन.. मन है विश्वास.. पूरा है विश्वास..

(बबन डोळे पुसतो.. पडदा पडतो.)

# अंक दुसरा

## प्रवेश १

*स्थळ: एक बस स्टॉप.*

*बसस्टॉपवर शाल्मली. वाट पाहात बसलेली. फोन करते..*

शाल्मली: कुठे आहेस रे.. वाट पाहातेय.. लवकर ये..

*(थोड्याच वेळात बबन येतो. अंगात भगवा शर्ट.. पायजमा. कपाळावर गंध. एखाद्या देवभोळ्या देवभक्तासारखा दिसतो.)*

बबन: आलो गं..

शाल्मली: हा असा?

बबन: असा म्हणजे कसा?

शाल्मली: या कपड्यांत. दिसतोस क्यूट पण.. फॅन्सी ड्रेस मध्ये पहिला येशील. छान..

बबन: छान काय.. परिस्थिती माणसाला काय काय करायला लावते नाही? मलाच माझ्यावर विश्वास नाही बसत.. गाणं म्हणू? क्या से क्या हो गया.. तेरे प्यार में.. बघ ना जीन्स सोडून मी असला पायजमा घालून फिरतोय .. वक्त वक्त की है मजबूरी.. कहीं हो न जाए हममें दूरी..

शाल्मली: काय असा.. असले दुर्मुख जगणे.. त्यापेक्षा लक्षात ठेव या बस स्टॉपचा दृष्टांत..

बबन: म्हणजे काय?

शाल्मली: साध्याही विषयात आशय मोठा किती आढळे! हा बस स्टॉप आहे.. किती बसेस येतात नि जातात.. तसे आयुष्य आपले.. किती घटना घडतात.. घडत राहतात..

नवनवीन काही होत राहते.. पुढे ट्रॅफिक असला तरी दुसरी बस काही यायची थांबते का? आणि समजा चुकली एक बस.. एक ना एक दिवस दुसरी मिळेलच ना? तेव्हा एक प्रयत्न फसला.. दुसराही फसला म्हणून असा तोंड पाडून नको बसूस.. बस लाल असली तरी तो काही धोक्याचा इशारा नाही..तो चैतन्याचा रंग समज.. तेव्हा चीअर अप..

बबन: माझे दोस्तलोक पण हेच म्हणतात.. म्हणतात एव्हरी डॉग हॅज हिज डे..

शाल्मली: तू कुत्र्याचे कसले देतोस उदाहरण?

बबन: कारण तेच तर आले धावून.. अंगावर.. तुझ्या बंगल्यात.

शाल्मली: सॉरी रे.. अरे तो धर्मेंद्र नवीन कुत्रा आहे ना.. तुला मी म्हणाले होते.. येऊ नकोस. तो कुणालाच आवरत नाही एक पपा सोडल्यास. आणि तो भुंकायला लागला की बाकी सारे कुत्रे पण मागे लागतात. अनमॅनेजेबल.. पण सगळयात धर्मेंद्र त्यांचा लाडावलेलाय आणि लाडाने बिघडलेलाय..

*(बबन हसू लागतो..)*

शाल्मली: त्यात हसण्यासारखे काय आहे?

बबन: तुला ते कुश्या नि चिन्या ठाऊक आहेत?

शाल्मली: हां.. तुझ्याबरोबर असतात कधी कधी..

बबन: तर ते म्हणतात.. हेच तुझ्याबद्दल.. अमीर बाप की बिगडी औलाद!

शाल्मली: क्काय?

बबन: नाही म्हणजे मी नाही तसे म्हणत.. ते म्हणतात..

शाल्मली: ते जाऊ देत .. एरव्ही मी रागावले असते.. पण आज राहू देत.. पुढे याचा हिशेब करीन.. आजची वेळ ही अशी.. तर हा बावळा वेश घालून नि अंतरी ना ना कळा घेऊन कुठे चाललास?

बबन: भक्तीमार्गी तल्लीन होण्यास! तुझे पपा स्वामींचे पट्टाशिष्य. त्यांच्या स्वामींच्या शोधात फिरत होतो. गुरूबिन कौन बतावे वाट! तुला ती अनिर्बंधस्वामींची गोष्ट नाही सांगितली मी..

शाल्मली: कसली रे? हे कोण नवीन प्रकरण?

बबन: प्रकरणच.. पण ती गोष्ट नंतर.. तर मी ठरवले.. हा तुझ्या पप्पांच्या अंत:करणाचा ठाव घेण्याचा.. म्हणजे शोध आहे ना..तो भक्तीमार्गातूनच करावा लागेल. भक्ती हीच शक्ती आणि भक्ती हीच युक्ती.. आणि तिच्यातूनच मुक्ती!

शाल्मली: काय रे.. असे काही शोभत नाही.. तुझ्या तोंडी..

बबन: इस इश्क ने निकम्मा बना दिया.. वरना हम भी थे काम के.. अगं करावे लागते. ज्या मार्गावर खाच खळगे, काटेकुटे आणि दगडधोंडे आहेत.. असणारच.. पण पथिकास प्रवास त्यातूनच करावयाचा आहे. आणि हा भक्तीपंथच त्यास तिथवर घेऊन जाईल. मी अर्बुदस्वामींचा मठ शोधावयास गेलो होतो. म्हटले जो स्वामी ससुरका वही मेरा..

शाल्मली: ससुर?

बबन: हुं.. ससुरभाऊ.. तुम्हारी पाठ मऊ!

शाल्मली: मग सापडले का स्वामीजी?

बबन: छे! कसले काय.. कुणास ठाऊकच नाहीत असले कुठले स्वामी.. तुला ठाऊक आहेत?

शाल्मली: असतील कोणी. मला काय ठाऊक? पप्पा आणि त्यांचे बाबा..बुवा.. स्वामी.. आणि महाराज! आईपण नाही पडत त्या भानगडीत. पण तुला सांगू आमच्याकडे काही झाले तरी चार कुत्रे असतातच. दत्तगुरूंचे म्हणून. पप्पा तर गाय देखील पाळणार होते एक. आईने अगदीच विरोध केला म्हणून. आई म्हणाली.. गोठ्यात नाही राहणार मी.. पपांना ऐकावेच लागले.. नाहीतर गाय पण असती आमच्या बंगल्याबाहेर.. शेणासकट!

बबन: समर्थाघरचे श्वान ऐकून होतो आजवर.. समर्थाघरची धेनू.. प्रथमच.. तर गाईसाठी पार्किंग बनवले असते तुझ्या पप्पांनी! असू देत .. तर ते स्वामी काही सापडले नाहीत. आजचा दिवस गेला वाया. कसे काय प्रूव्ह करावे? काही सुचेना..

शाल्मली: बघ ना. लोकांना पैसे नसतात म्हणून प्रॉब्लेम्स.. इथे ते आहेत म्हणून प्रॉब्लेम!

बबन: बालिके.. हम सब समस्याओंके समंदर से घिरे हुए हैं. भवसागरमें लहरें उठती हैं.. कभी तूफानी.. कभी हल्की.. कधी त्या लाटांच्या माऱ्यातून नौका वाहून जाते.. तर कुशल नावाडी ती नाव किनाऱ्यास आणून सोडतो. आहे की नाही गंमत. तर तूर्तास सागर खवळलेला आहे. लाटा उठताहेत.. आपल्याला सांभाळावे तर लागेल. पण एक न एक दिवस समुद्र शांत होईलच! किनारा गाठेलच आपली जीवन नौका!

शाल्मली: वा! काय आशावाद! आणि खरेच कुठल्या स्वामींचे भाषण.. म्हणजे प्रवचन ऐकून आलास की काय?

बबन: नाही.. त्यादिवशी त्या अनिर्बंधस्वामीच्या नाटकासाठी केली प्रॅक्टिस! तुला ठाऊक नाही ना.. तर काय झाले ना.. तुझ्या पप्पांचा एक नोकर आहे. तो मक्याला ओळखतो. मग त्याच्याकडून तुझ्या पप्पांना पाठवले संदेश.. एक पॉवरफुल स्वामी अनिर्बंध यांच्या दर्शनासाठी.

शाल्मली: त्याने काय होईल?

बबन: होईल.. नाही.. काय झाले असते? मक्या आला अनिर्बंधस्वामी बनून. तो सांगणार होता माझ्याबद्दल.. तुझ्या पप्पांना..

शाल्मली: मग?

बबन: मग काय! विचारू नकोस.. व्हेअर डीड द फ्लाय स्नीझ? कुठे शिंकली माशी? आम्हाला.. म्हणजे मक्यास्वामीला पोचायला उशीर झाला.. तोवर तुझे पपा.. निघून गेले.

शाल्मली: हे कधी?

बबन: काही नाही.. त्या कुत्र्याच्या हल्ल्यात आम्ही जखमी झालो त्याच्या दोन दिवस आधी! आता तर काय करावे तेच सुचत नाही.

शाल्मली: हुं.. खरंय. पण त्यांचे पण खरंय ना. दुनिया इतकी वाईट आहे. ते तुला ओळखत नाहीत ना. त्यांना वाटते ती शंका तशी रास्त आहे.. त्यांच्या दृष्टीने..

बबन: हुं.. असेलही.. पण आता नवीन काही सुचेतोवर असेच.. अधांतरी! तरी माहिती तर काढ.. अर्बुदस्वामी कुठे नि काय.. तिकडून काही मदत मिळाली तर.. स्वामीकृपा आणि काय!

शाल्मली: बघते. पण मी विचारायला गेले की पप्पांना काही संशय येईल.. मी कधीच याबद्दल त्यांच्याशी बोलत नाही ना म्हणून. तेव्हा कसे करायचे ते पहावे लागेल..

बबन: ठीक.. म्हणजे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे म्हण की! तू काय मराठीची स्कॉलर! मोठेमोठे शब्द वापरू शकतेस!

शाल्मली: आहेच मुळी. मी तर पीएचडी देखील करणारे मराठीत. आपल्या भाषेचा गोडवा आहे ना तो अन्य कुठेच नाही. त्यातच संशोधन करणार आहे मी..

बबन: तर मी सुद्धा हेच करतो.. करतो म्हणजे करावेच लागेल मला.. संशोधन! हाय काय आन नाय काय!

## प्रवेश २

*स्थळ: होस्टेलची खोली*

*बबन एकटाच बसलाय. हातात मोबाईल घेऊन. त्याच्याकडे बघतो. परत ठेवून देतो. मग तो मोबाईल वाजतो..*

बबन( फोनवर): बोल गं.. काय?

तिकडून आवाज.. फोनवर शाल्मली आहे..

फोनवरून शाल्मली: अरे काय रे फोन उचलत नाहीस. काल कितीदा फोन केला मी.

बबन: हुं.. पाहिला मी..

शाल्मली: पण ऐकला नाहीस?

बबन: मूड नाही.. नव्हता..

शाल्मली: का?

बबन: का काय? अंध:कारमय भविष्य असताना कसा काय राहू मूडमध्ये?

शाल्मली: काहीही.. त्यादिवशी मोठे प्रवचन झाडलेस आणि भवसागरातून नैया वगैरे काय काय बोललास आणि तू असे हातपाय गाळून बसलास?

बबन: अगं ते सारे म्हणजे.. शब्द बापुडे केवळ वारा! नुसते तोंड चालवून कुणी असल्या संकटांस तोंड देते काय? उगाच आपली मनाची समजूत! आणि माझ्यामुळे तुझीही हालत!

शाल्मली: खरेय.. मग काय करूयात? सोडून देऊ?

बबन: काय?

शाल्मली: काय काय? तुला..तुला तेवढाच त्रास कमी.. क्काय? नाही तुझीच तशी इच्छा..

बबन: सॉरी.. सॉरी.. कान पकडून सॉरी!

शाल्मली: आता परत असले काही बोललास तर मी कुण्या दुसऱ्याबरोबर पळून जाईन..

बबन: वा! बिचारा! कोण बरे असा असेल..

शाल्मली: क्काय? परत बोल..

बबन: अगं मी बिचारा.. तो नशीबवान कोण असेल.. असे म्हणत होतो मी..

शाल्मली: कळ्ळं.. माझी कर्णेंद्रिये तशी तीक्ष्ण आहेत..

बबन: आणि जीभ पण..

शाल्मली: क्काय?

बबन: काही नाही.. माझी जीभ पण मध्येमध्ये घसरते म्हणत होतो मी!

शाल्मली: हुं.. जास्तच निसरडे झालेय सगळीकडे नाही?

बबन: हुं.. तुझ्याकडे काय हालचाल? नवीन कोणी स्वामी? आणि अर्बुदस्वामींचा काही पत्ता?

शाल्मली: नाही रे.. अजून तसा प्रसंग आला नाही ज्यात हा विषय निघेल. तरी हमारी सारी कोशिशे जारी हैं.. थोडी देर बाद पुन: प्रयत्न करें!

बबन: बघ.. मला तरी तोच एक आशेचा किरण दिसतोय.. स्वामी अर्बुदानंद की जय!

शाल्मली: म्हणजे काय.. तू काय त्यांचा शिष्य तर नाही बनणार ना?

बबन: का नाही? तुझ्यासाठी मी त्या स्वामींचे शिष्यत्व पत्करीन.. भगवी वस्त्रे धारण करून तप करीन.. संन्यास घेईन!

शाल्मली: माझ्यासाठी.. आणि संन्यास?

बबन: अगं.. गंमत. बघ परिस्थितीजन्य विनोद!

शाल्मली: बरंय.. आज काय कामकाज?

बबन: काय नाय.. लोळत बसेन पसरून पाय.. हाय काय अन नाय काय!

शाल्मली: चल.. बाय.. ठेवते.. नोटिंग गनीम्स प्रेझेन्स अराऊंड.. बाय..

बबन: बाय.. चला आता काय? हाय काय अन नाय काय! आणि काय!

(*फोन ठेवतो.*

*मक्या आत येतो..)*

मक्या: तुझ्या प्रेमव्यासंगात व्यत्यय तर नाही ना आणला? तू आणि तुझे प्रेमसंवाद हे माझे आदर्श आहेत!

बबन: वा! गटण्या! पण ऐक.. प्रेमसंवादाची कसली आलीय वेळ! बरं का गटण्या..

मक्या: खरेय तुझे.. माझा अनुभव शून्य!

बबन: का? त्या सायली साळगावकरला सतत  सायलेंटली कोण बघत असते?

मक्या: चूप रे.. ते उगाच..

बबन: लाजू नकोस.. पण गिव्हन दॅट शी इज नॉट बिग बिझनेसमॅन'स गर्ल.. तुझा मार्ग सोपा आहे.. कदाचित माझ्याआधीच तू होशील नंबर लावून मोकळा!

मक्या: घे! आणलाय मी खायला ढोकळा!

बबन: कुठेय?

मक्या: नाहीच आहे.. जस्ट यमक जमवण्यापुरते रे.. कुठवर आली अर्बुदस्वामी शोध मोहिम?

बबन: बा मक्या.. जी गोष्ट अजून सुरूदेखील झाली नाही.. ती येऊन येऊन येणार कुठवर?

मक्या: अरे सुरूवात आणि अंत ह्या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत!

बबन: असतीलही.. पण मुळात त्यासाठी मुदलात ते सुरूवातीचे नाणे तरी हवे ना? कुठेच नाही लागला पत्ता..

मक्या: मला देखील! मी त्या शहापूरकराच्या नोकरास विचारले.. त्याला देखील पत्ता नाही. म्हणाला, मोठ्या लोकांच्या मोठ्या गोष्टी.. तो फक्त हुकूम पाळतो..

बबन: हुकुमचंद नाव असेल त्याचे..

मक्या: आता ही गोष्ट समज मी लिहित असतो तर काय केले असते.. हे बघ.. आपण काही न काही रस्ता शोधून काढू.. हिंमत हारू नकोस.. व्हॉट अबाऊट शांती'स मदर? म्हणजे त्या रूट ने ट्राय केले तर?

बबन: उस रूट की कौनसी लाईने ओपन नहीं हैं.. नाही.. या बाबतीत शहापुर इज व्हेरी पर्टीक्युलर! आणि ही इज राईट अॅज वेल.. दिवसमान खराब आहेत.. कुणाचा काय भरवसा. शाल्मली एकुलती एक.. ही इज बाऊंड टू थिंक यार.. त्याचा आपल्याला त्रास होतोय.. पण खोटे नाही काही..

मक्या: वा! ससुरा ससुर लकी है.. ऐसन जमाईराजा मिल रहा.. तू काय वकीलपत्र घेतलेस त्या शहापूरकराचे..

बबन: नाही रे.. पण तरीही.. अरे काहीतरी होईल..

मक्या: हेच तुला सांगतोय मी!

*(कुश्या आत शिरतो..)*

मक्या: यावे कुश्या भाऊ.. काय खबर आणलीत? आपल्या मुलुखात अर्बुदस्वामींचा आपणास काही ठावठिकाणा ठाऊक झाला काय? की नुसताच ठणाणा?

कुश्या: नाही.. सरदार.. स्वामींच्या ठावठिकाण्याचे काही धागेदोरे हाती आले आहेत.. अधिक तपास सुरू आहे.. चिन्या त्या मागावरच गेला आहे.. कुठल्याही क्षणी मोहिम फत्ते झाल्याची खबर येऊन धडकेल आणि तुम्ही स्वहस्ते आपल्या गळयातील मोत्यांचा हार आम्हांस बक्षीस द्याल याबद्दल या कुश्याला बालंबाल खात्री आहे! तेव्हा त्या माळेस तयार ठेवावे!

*(कुश्याचा फोन वाजतो..)*

कुश्या: थिंक ऑफ द डेव्हिल.. हा बघ चिन्याचा फोन! बोल.. काय.. मोहिम फत्ते..काय? हे वेगळे.. अर्गुदानंद? आनंद आहे! काय पण नावे घेतात हे स्वामीलोक.. अनिर्बंध अगदी! ठीक.. तुझ्यामुळे माझा मोत्याचा हार हुकला.. काही नाही.. ठेव!.. तर मित्रों.. हे असे आहे.. आता पुनश्च हरी ॐ आणि काय!

बबन: साऱ्या वाटा बंद झाल्यात की काय..

मक्या: पण हरकत नाय..

पुन्हा पुन्हा करू ट्राय

सगळीकडे पसरू हात पाय..

अरे हाय काय आणि नाय काय..!

(बबनचा फोन वाजतो.)

बबन (फोनवर): ओ शालू .. हाय.. थांब..

*(दूर जाऊन उभा राहतो..)*

कुश्या: एवढे गुलुगुलु सिक्रेट काय असणार?

मक्या: मला काय ठाऊक? आपल्याला नाय ब्वा एक्स्पिरीयन्स..

*(जाता जाता बबन त्यांना गुद्दे मारण्याची अ‍ॅक्शन करतो..मग फोनवर बोलू लागतो..)*

बबन: हो?.. खरंच.. आय काण्ट बिलिव्ह धिस.. काय सांगतेस? खरेच.. की उगाच आपली गंमत?.. बरं.. कधी..? ओके.. थॅंक्यू.. क्यूं.. क्यूं नहीं.. शेवटी लाईट अ‍ॅट एंड ऑफ टनेल.. फनेल नाही.. टनेल.. एक पाऊल पुढे.. होईल.. परवा?.. ओके.. पण कसे झाले सगळे..? काय सांगतेस? होप सो.. होपफुली.. फुल्ली नाही..फुली.. होपफुली.. ओके.. यस्स.. जाईन.. एकटा? ओके.. नो प्रॉब्लेम.. डन.. हो.. बाय.. थॅंक्स.. परीक्षा असल्यासारखे वाटते मला.. हो ना! विश मी ऑल द बेस्ट.. दुरूनच.. धन्यवाद! पुन्हा आपली भेट.. बाय.. नाही आता नको.. तुझ्याकडेच थोडी असतो गनीम.. म्हणजे हो.. इथेही आहेत

*(मक्या नि कुश्याकडे बोट दाखवत) गनीमोंके गनीम.. गनिमोत्तम.. बाय!*

*(मक्या आणि कुश्या आतापर्यंत कान देऊन ऐकत असतात.. बबन त्यांच्याकडे वळताच एकाएकी आपले लक्ष नाही असे दाखवत उभे राहतात.)*

कुश्या: काय रे.. काही विशेष?

मक्या:

माशुका का एक एक लब्ज लगे हमें खास खास..

दूर वो कितने भी हो लगते हमें वो पास पास!

समझा करो यारों हमारे दिलका ये एहसास

कुश्या: क्यों बे.. अबहीच क्यूं खत्म हुआ रेल्वे पास!

चिन्या: वा! झकास!

मक्या: और एक.. अर्ज किया है..

आशिक की गली में हम जाने के लिए बेताब दिनरात..

जाते थे जरूर.. पण परिस्थिती जो बेतासबात..

बबन: सोड रे.. अरे गुड न्यूज..

मक्या: तो क्या शापूरजी मान गया?

बबन: एवढी पण गुड नाही रे न्यूज..

मक्या: मग?

बबन: न्यू न्यूज इज.. शहापूरकर हॅज गिव्हन ॲड्रेस ऑफ अर्बुदस्वामी..

मक्या: तर कधी जाऊया आपण..?

बबन: आपण नाही.. मी. वरून ऑर्डर आहे.. मी जाऊन प्रत्यक्ष अर्बुदस्वामींना भेटावे.. स्वामीजी परीक्षा घेणार.. त्यात पास झालो तर पुढे.. आणि मला एकट्याने जावे लागणार.. तसा हुकूम आहे! शाल्मलीला पण बंदी आहे तिथे जायला!

मक्या: म्हणजे एंट्रन्स एक्झाम! अब तुम्हारे हवाले..

बबन: काही म्हणा एक पाऊल तर पुढे पडले..

मक्या: तोंडी परीक्षा भाऊ.. पास होशील ना?

कुश्या: देऊन टाक तोंड तोंडी परीक्षेस

मक्या: गर उनसे है एक दिन मिलना..

तो ऐसाहीच तो पडेगा ये करना..

देऊन टाक परीक्षा आणि होऊन जा पास..

कुश्या: मिळेल तुला या रिझल्ट अगदी खास..

चिन्या: जा उल्लंघून डोंगर ठेवून भक्कम पाय..

कुश्या: अरे हाय काय अन नाय काय!

## प्रवेश ३

*स्थळ: एक खोली. छोटीशी पण श्रीमंती दाखवणारी. एक सोफा सेट आहे बाजूला दोन खुर्च्यांसकट. पाठी वातानुकूलन यंत्र आहे. सोफ्यावर मध्यभागी अर्बुदस्वामी. त्यांच्या आजूबाजूला चेले आहेत..तेच जे शहापूरकरांसोबत आधी आलेले. अर्बुदस्वामी एखाद्या स्वामीसारखेच आहेत. लांब पांढरी दाढी.. लांब पांढरे केस. हातात एक त्रिशूळ घेऊन बसलेले. बबन आत शिरतो.*

चेला १: यावे यावे.. साहेबांनी पाठवलेले ते साहेब..आलेत साहेब..

चेला २: गुरूजी. गुरूजी.. बबन बोरकर आले आहेत.

स्वामी: कोण बबन बोरकर? कोण? बबन बोरकर?

(बबन आत येतो )

स्वामी: ये वस्ता.. वत्सा.. ये. बस असा.

*(बबन वाकून नमस्कार करतो.)*

बबन: स्वामीजी तुमच्या चरणी शरण आलोय मी..

स्वामी: छान.. श्रीयुत शहापूरकर म्हणजे आमचे परमशिष्य. त्यांनी सांगितलेय काही तुझ्याबद्दल.. आणि न सांगितले ते आम्ही तुझ्या डोळयांत पाहून जाणून घेऊच. त्याचसाठी तर तुला इथे पाठविले आहे. बस त्या आसनावर. तथास्तु!

*(बबन खाली बसतो.)*

स्वामी: उठ वत्सा.. खुर्चीवर बस..

बबन: नको.. माझी जागा तुमच्या चरणी..

स्वामी: ठीक.. बस खालीच. खोली आताच तर झाडली आहे.. तर ऐक.. तुझ्या कपाळावर जी रेषा आहे तिच्याकडे पाहून मी सांगू शकतो..

बबन: काय स्वामी?

स्वामी: तुझे भूत आणि भविष्य.. आणि वर्तमानही. वत्सा.. तुजप्रत कल्याण असो. तथास्तु..?

चेला १: काय हवेय स्वामीजी?

स्वामी: आमचा चिमटा कोठे आहे.. जल्दी शोधून आणा.. नाहीतर भस्म करून टाकेन.. तथास्तु!

बबन: कोणाला स्वामी? (जीभ चावतो.. मनात.. कुणाला का करेनात भस्म.. तथास्तु म्हणे.. रागावल्यावर तथास्तु म्हणतात की काय?)

*(चेला चिमटा आणून देतो..)*

स्वामी: मूढ बालक.. तू अजून दुनिया देखलेली नाहीस. संसाराचे सारासार ज्ञान तुला नाही.. तू अजून भवसागरात नौकाविहार केला नाहीस.. तू अजून अंडे फोडून बाहेरही आलेला नाहीस बलका.. नाही बालका.. तुज नाही उमगणार हे सारे आता. पण उमगेल तोवर वेळ टळून गेली असेल.. तेव्हा गुरूला शरण जा..

बबन: ते तर मी गेलोच आहे स्वामीजी. मी तर माझ्या मित्राकडून आपली म्हणजे श्री अर्बुदस्वामींची आरतीही लिहून आणली आहे.. आज्ञा असेल तर म्हणू?

स्वामी: मित्र? मग तो मित्र स्वतः का नाही आला?

बबन: शहापूरकरांची आज्ञा.. मी एकट्याने जावे.. म्हणजे यावे.. आरतीच्या चार ओळी ऐकवू स्वामीजी?

स्वामी: ऐकव.. बलका.. बालका.. अंड्यातून बाहेर आला नसल्याने मला बलक वाटलास तू मूर्ख बालका.. भस्म करून टाकेन..तथास्तु.. म्हण त्या आरतीच्या ओळी!

बबन:

आरती स्वामी अर्बुदा । तुजवीण सारे बरबुदा

आरती स्वामी अर्बुदा १

चमत्कारांचे वाहवी पाट । तुझ्या लीला अफाट

हाती घेऊ आरतीचे ताट । तुझे करू गुणगान बेफाट ॥

आरती स्वामी अर्बुदा..२

युगे अठ्ठावीस असे उभा । माथा तुझा पोहोचतो नभा

तुझ्या भक्तीने रे होई  शोभा । चोहो दिशांस फाके प्रभा ॥

आरती स्वामी अर्बुदा..३

शरण तुला जो येतो । भक्तीभावे सारे मिळवितो

येताना असतो मुंगी । हत्ती होऊनिया जातो ॥

आरती स्वामी अर्बुदा..४

स्वामी: छान.. वा! आम्ही प्रसन्न आहोत.. अत्यंत मनोरम रचना.. मनोज्ञ शब्द.. मनमोहक.. अजून काय म्हणावे..

*(स्वामींचा आय फोन वाजतो..)*

स्वामी: हॅलो.. स्पीकिंग.. येस..येस.. (झटक्यात बबनकडे लक्ष जाते) येसूबाई येरवडकर? उद्या मठीत या.. (पटकन फोन ठेवून देत) भक्तांच्या कल्याणा संतांच्या विभूती.. पाहूनिया तृप्त कोण झाला? म्हणजे नुसतेच संतदर्शनाने कोण तृप्त होईल? करावे लागेल त्यासाठी भक्तीमार्गे चिंतन.. मनन.. वाचन.. लेखन.. वत्स.. तर मला असे

दिसते की तुझ्या ललाटी दोन कन्यांनी घोटाळा केला आहे.. एक अति गरीबाघरची आणि दुसरी कुबेराघरची..

बबन: पण स्वामी..

स्वामी: भस्म करून टाकेन..तथास्तु.. मध्ये बोलत नाहीत मूढ मुला.. यावेळेस तुज क्षमा आहे.. मूढ बालक.. मला स्पष्ट दिसत आहे तुझ्या कर्मगतीचा फेरा.. नियतीची करणी अगाध आहे.. नियतीची करणी आणि नारळात पाणी! तर नियतीचा फेरा कुणास चुकला? पण आम्ही ईश्वरी विभूती तो बदलून टाकितो. नियतीच्या मनात असे आहे बालका.. ती गरीबाघरची जी आहे ती तुझा उद्धार करील.. विवाहोत्तर उत्तरोत्तर प्रगती आणि धनधान्याच्या राशी आणील.. आणि दुसरी जी आता कुबेराघरी आहे तिच्या भाग्यात त्याउलट नोंद आहे.. तू आणि तिचे कितीही प्रेम असेल तरीही तुझा उत्कर्ष तिच्या कुंडलीतील वक्री ग्रहांमुळे टळेल.. टळटळाट.. नाही तळतळाट भोगावे लागतील मातुल घराण्याचे.. तेव्हा बालका.. आम्हाला स्पष्ट दिसत आहे येथून.. बोल काय म्हणणे आहे तुझे?

बबन: स्वामीजी.. मनावर प्रेम करणाऱ्या कोणास धनाची तमा नाही. कुबेराच्या महाली राहात असो की चंद्रमौळी झोपडीत.. आपण जिच्यावर प्रेम केले तिला फक्त या गोष्टीसाठी सोडावे? पटत नाही मला.. स्वामीजी.

स्वामी: असे म्हणतोस.. पण मूढ नादान इत्यादी बालका.. आम्हास येथे दुर्गती योग दिसत आहे.. त्याने तुझ्या प्रकृतीस धोके संभवतात.. वेळप्रसंगी.. जीवितास धोका..

बबन: स्वामीजी.. कुणी फार पूर्वी म्हणून गेले.. क्षण एक पुरे प्रेमाचा.. वर्षाव घडो मरणांचा! आणि मरणात खरोखर जग जगते.. तेव्हा स्वामीजी याबाबतीत मी माझ्या मनाचे सोडून अन्य कुणाचे का ऐकावे?

*(स्वामी विचारात पडल्यासारखे वर नजर लावून बसतात. आपल्या लांब दाढीत हात फिरवत..)*

*(बबन मनात.. च्यायला.. ही दाढी मक्याच्या त्या पहिल्या दाढीसारखीच वाटतेय.. )*

स्वामी: अज्ञानी आणि नादान बालका.. जो आपले भविष्य माहित असूनही भवितव्याची चिंता करीत नाही अशा यत्किंचीत जंतुसारख्या क्षूद्र जीवा.. चराचर सृष्टीत चरण्यासाठी जन्म घेतला या नश्वर देहाने.. पण जा. या भवसागरात धक्के खाण्यास जन्म तुझा. तसेच तुझ्या ललाटी लिहिले तर त्यास हा अर्बुदस्वामी काय करणार? जा.. आम्हाला स्पष्ट दिसतेय.. तू अनिर्बंधस्वामींच्या बरोबर असतोस. त्या दिवशी साहेब आले तेव्हा आम्ही होतो तिथे.. सूक्ष्म अवस्थेत. स्थूलावस्थेत नाही.. जसे तुझे अनिर्बंधस्वामी होते.. तर ते अजून आले की नाहीत स्थूलावस्थेत?

*(बबन गडबडतो. काय बोलावे न सुचल्याने गप्प राहतो. स्वामीच ते. अंतर्ज्ञानाने खरे काय ते ठाऊक असेल यांना तर कठीण आहे..)*

आणि त्या अगडानंद स्वामींना ओळखतो आम्ही.. ते आणि आम्ही.. हिमालयात एका पायावर तपासाठी एकत्र होतो चौदा वर्षे! एकाच वाघिणीचे दूध प्यालोय आम्ही.. पाश्चराईज्ड!

*(बबन अजून गोंधळतो..)*

बस वत्सा.. बस. तुझ्या ललाटरेखेवर एक एक घटना नोंदलेली आहे. मी स्पष्ट वाचू शकतो. भूत आणि भविष्य दोन्ही! तेव्हा आता जा! तुजप्रती कल्याण असो.. भस्म करून टाकीन.. जा.. तथास्तु.. ॐ शांती शांती शांती:

*(बबन चमकून वर पाहातो.. मग वाकून नमस्कार करतो. आणि लगबगीने निघून जातो. पाठोपाठ चेला नंबर २ हळूच त्याच्या मागे बाहेर पडतो..)*

चेला १: साहेब गेला तो बबन..

स्वामी: हुं.. गेला एकदाचा. फार जास्त चुका नाही ना झाल्या?

चेला १: नाही साहेब!

स्वामी: काय बोलावे सुचेना.. त्यादिवशी त्या अनिर्बंध नामक स्वामीचा रोल पहायला पाहिजे होता. पण आपण उगाच लवकर निघून गेलो. पण काही म्हणा ही तरूण

पिढी हुशार खरी. हे नाटक करायचे तर डायलॉग पण आपणच लिहायचे? घाम फुटला मला.. कठीण आहे.. पण झाली.. वरपरीक्षा झाली. मुलगा चांगला वाटतोय.

चेला १: होय साहेब

स्वामी: अरे माझ्यापर्यंत पोहोचायला काय काय नाही केले याने.. धर्मेंद्र मागे लागला याच्या! पण हुशार आहेत पोरं..यांच्याकडूनच मिळाली ही आयडिया.. आमच्या वेळी आम्ही तर कधीच हार पत्करली असती..

चेला १: होय साहेब.. न .. नाही साहेब..

स्वामी: आला का तो गेलेला?

चेला १: कोण साहेब?

इतक्यात चेला २ आत येतो..

स्वामी: काय खबरबात? त्याला संशय तर नाही ना आला?

चेला २: नक्की नाही सांगता येत साहेब.. बाहेर पडल्यापडल्या त्याने फोन लावला.. कुणाशी बोलत होता कुणास ठाऊक.. पण म्हणाला.. अर्बुदस्वामी तेज:पुंज दिसतात..

स्वामी: वा! मेकप छान झालाय म्हणायचा!

चेला २: पण नेहमीच्या स्वामी आणि महाराजांच्यासारखे वाटत नाही म्हणे.. आपल्यासारखेच वाटतात.. आणि म्हणाला.. ती दाढी त्या अनिर्बंधस्वामींच्या दाढी सारखीच वाटते एकदम! आणि या जटा देखील!

स्वामी: ते तर होणारच ना.. त्यांनी जिथून आणली तिथूनच तर आपण आणलीय भाड्याने! कमीत कमी त्या मगनलाल ड्रेसवाल्याला सांगायला हवे होते.. अजून काही बोलला तो?

चेला २: दुसरा फोन केला त्यानी.. पण बोलत बोलत निघून गेला फास्ट..

स्वामी: काही हरकत नाही.. चला या शहापूरकराचा आयुष्यातला पहिला.. आणि खऱ्याखुऱ्या नाटकातला पण पहिला रोल बरं..कठीण आहे.. कुणाला ठाऊक झाले तर हसतील.. कॉमेडी रोल म्हणून!

चेला १: नाही साहेब!

स्वामी: नाही?

चेला २: होय साहेब!

स्वामी: चला काढून टाकू या जटा नि दाढी.. जंजाळ नुसते!

शहापूरकर आपली दाढी नि जटा काढून ठेवता ठेवता अंधार होतो

प्रवेश ४

*स्थळ: बसस्टॉप , शाल्मली आणि बबन बोलत बसलेले आहेत.*

बबन: बोल .. एवढ्या तातडीने का बोलावलेस.. कुठे मुंग्यांनी मेरूपर्वत तर नाही ना गिळला? की कुणी हट्टी मुंगी हत्तीच्या कानात तर नाही ना शिरली आणि धारातीर्थी पडले गजराज? किंवा.. शाल्मली: ते सारे होऊ शकते.. पण हे झाले यावर माझा विश्वास बसत नाही!

बबन: हे म्हणजे? म्हणजे काय?

शाल्मली: ओळख.. दोन चान्स..

बबन: हे अत्यंत चूक आहे शालू.. अगं इथे क्षणश: कणश: टेन्शन मध्ये मी आणि तू घालतेस कोडी..आणि करू पाहतेस कोंडी.. एक तर दिलेस त्या स्वामींच्या तोंडी.. आणि कोडी घालतेस.. ते ही इथे बसस्टॉपवर बोलावून.. एक तर कोडी सोडवता येत नाहीत मला.. त्यापेक्षा आता येणारी बस कुठल्या नंबरची असेल याचा अंदाज जास्त अचूक असेल माझा! आणि तू.. बरं.. एक हिंट तर दे..

शाल्मली: हिंट.. साधू संत येती घरा..

बबन: म्हणजे.. अजून कुणी स्वामी सापडले तुझ्या पप्पांना? कोण? आता अजून कुठल्या स्वामींकडे जाऊ मी परीक्षा द्यायला.. अर्बुद झाले आता बर्बुद? शाल्मली: तेच..

बबन: लवकर.. मला त्या अर्बुदस्वामींकडे काय काय झाले त्याचा डिटेल वृत्तांत द्यायचाय..

शाल्मली: अजून? फोन वर झाले ते.. त्यापुढे पाऊल टाकायची वेळ झालीय बबुल्या..

बबन: पण अशी कशी तुझी हिंट? ज्यातून काहीच मिळत नाही क्लू.. सांगून टाक.. नको टेन्शन.. आधीच मी आहे ब्लू.. ब्लू म्हणजे टेन्शन बरे मराठी प्राध्यापिका बाई..

शाल्मली: असेल.. हरलास?

बबन: तुझ्या बरोबर हरायला ही हरकत नाही माझी.. बोल.. लवकर..

शाल्मली: बोलते.. अरे पप्पा..

बबन: काय नवीन..? तुझे लग्न ठरवून मोकळे झाले.. की तुला पाठवताहेत .. अमेरिकेत.. मराठीच्या उच्च शिक्षणासाठी? की अल्टिमेटम मिळालाय .. बेटी.. उसे भूल जा.. नाहीतर तुला बंद करून ठेवतील ते कुठल्याशा अडगळीच्या खोलीत!

शाल्मली: नाही रे .. उगाच ओव्हर रिॲक्ट होऊ नकोस.. बातमी चांगली आहे..

बबन: सांगतेस काय.. अशीही असू शकते बातमी? बोल बोल.. खूप दिवसांत चांगली बातमी नाही ऐकली.. जास्तीत जास्त चांगली बातमी अशी असू शकते.. कंटाळून तुझ्या पप्पांनी तुझ्या लग्नाची सारी जबाबदारी आईकडे दिलीय.. आणि म्हणाले, घाला काय घालायचा तो गोंधळ.. आणि आईला मनवणे तसे सोपे..

शाल्मली: आता गप्प बसून ऐकशील? पप्पांनी तुला होकार दिलाय.. अर्बुदस्वामींनी पॉझिटिव्ह रिपोर्ट दिलाय.. कळले का?

बबन: काय सांगतेस? माझा विश्वास नाही बसत.. चिमटा काढ मला

*(शाल्मली खरोखरच चिमटा काढते..)*

बबन: हळू गं. पडत्या फळाची आज्ञा घेतेस.. बोल बोल काय झाले नक्की?

शाल्मली: काय होणार? अर्बुदस्वामी हॅज पास्ड यू..

बबन: विथ डिस्टिंक्षन?

शाल्मली: त्याने काय फरक पडतोय? मी मार्कलिस्ट नाही पाहिली.. पण पप्पांनी पप्पूला पास केले! काठावर असो की पैकीच्या पैकी.. काय फरक फरक पडतो?

बबन: जय अर्बुदस्वामी.. कायच्या काय नाव आहे नाही? अर्बुद?

शाल्मली: असू देत.. हे स्वामी आपल्याला लाभले ते छान झाले.. काय विचारले तुला त्यांनी?

बबन: सांगू..? ही वॉज फनी. रागावून भस्म करून टाकेन म्हणायचा नि लगेच तथास्तुही! मध्येमध्ये अडखळायचा. बाकी स्वामीलोक कसे अस्खलित भाषण ठोकतात तसे नाही.. आणि भाषा पण बरीच बरी.. उगाच आत्मा परमात्मा वगैरे नाही.. फक्त भवसागर! आणि एक म्हणजे त्याला अनिर्बंधस्वामीही ठाऊक नि अडगानंद देखील!

शाल्मली: काय सांगतोस.. अंतर्ज्ञानी!

बबन: हो ना! मी शक्य तितके तोंड बंद ठेवले. उगाच स्वतःहून खड्ड्यात का पडावे? त्यापेक्षा गप्प राहिलेले बरे!

शाल्मली: मला एक सांग.. एक मिनिट.. मला वाटतेय मला काहीतरी लक्षात येतेय.. समथिंग फिशी..

बबन: म्हणजे? स्वामी सारखा स्वामी.. त्यात काय असणार फिशी?

शाल्मली: कोण बोलतंय हे? अनिर्बंधस्वामी.. अडगानंद स्वामी नि शिलानंद स्वामी.. होते ना खरेखुरे स्वामी? हंड्रेड परसेंट जेन्युईन!

बबन: म्हणजे अर्बुदस्वामी पण आमच्या सारखा?

शाल्मली: ऐक.. नाही सांग.. मी विचारते ते..

बबन: बोल..

शाल्मली: त्या स्वामीच्या डाव्या गालावर तीळ आहे का मोठा.. चामखीळी सारखा?

बबन: असेल.. इतके लक्ष देऊन पहायला तो काय माझा सासरा आहे..सॉरी.. आणि त्यात त्याची लांब दाढी.. गंमत सांगू .. अगदी अनिर्बंधस्वामी सारखी होती ती!

शाल्मली: एक मिनिट.. पांढरी.. लांब.. मला वाटतेय मी पप्पांच्या कपाटात आजच पाहिलीय..

बबन: म्हणजे?

शाल्मली: म्हणजे काय.. मला नाही माहिती.. तो चामखीळ आठव ना..

बबन: आठवतो.. हां.. मी लपूनछपून एक फोटो काढलाय स्वामीचा.. दाखवतो थांब..

*(मोबाईलमध्ये फोटो शोधतो..)*

बबन: हा बघ..

शाल्मली: बघू..आय काण्ट बिलिव्ह धिस.. बबन.. नो स्वामी नो अर्बुद.. अरे हे तर पप्पा आहेत..

बबन: शुअर?

शाल्मली: अरे ऑफकोर्स.. तो बघ चामखीळ..

बबन: चामखीळ कसली.. माझी तर दातखीळ बसलीय.. म्हणजे हे तुझे पप्पा.. खुद्द शहापूरकर!

शाल्मली: होय!

बबन: आणि त्यांना आमचे दोन्ही खोटे स्वामी ठाऊक आहेत!

शाल्मली: असणार..

बबन: नाही.. त्यांना हे सारे आधीपासूनच माहिती असणार.. अगदी अनिर्बंधस्वामीकडे ते आले त्याआधी पासून.. म्हणूनच ते लवकर निघून गेले..

असणार.. पण कसे? कुठून.. ते अनिर्बंधस्वामीचे लफडे तर तुला ही ठाऊक नव्हते..

शाल्मली: आय थिंक आय गॉट इट.. तुम्ही लोकांनी ते ड्रेस मगनलाल ड्रेसवाल्याकडून आणले होते?

बबन: अर्थात..

शाल्मली: ही ती लिंक.. मगनलाल ड्रेसवाला पप्पांचा खास दोस्त आहे..

बबन: म्हणजे त्यांनी ही त्या जटांचे लटांबर त्याच्याकडूनच आणले असणार?

शाल्मली: अर्थातच.. ती दाढी पण तीच असणार! सध्या ती आमच्या घरी आहे!

बबन: म्हणजे मी मेलो.. ठार मेलो.. पण.. पण एवढे होऊन पप्पांनी परवानगी दिली?

शाल्मली: अरे.. एवढे होऊन नाही रे.. ते पाहात असणार परीक्षा.. अर्बुदस्वामीची परीक्षा शेवटची असणार.. त्यात पास झालास.. तू.. मी ओळखते पप्पांना नीट.. बबन: काही म्हण.. तुझे पप्पा इज ग्रेट.. एक ते स्वामींचे खतरनाक बेअरींग सोडले ना तर बाकी सारे ग्रेट!

शाल्मली: आय नो! मला आश्चर्य वाटतंय.. ही आयडिया त्यांना कुठून मिळाली असेल?

*(बसस्टॉप मागून शहापूरकर बाहेर येत..)*

शहापूरकर: खरे सांगू.. या पोरांकडूनच..

शाल्मली: पप्पा.. तुम्ही?

*(बबन तोंड लपवण्याचा प्रयत्न करतो.. मग बसस्टॉपमागे पळून जातो.)*

शहापूरकर: शाल्मली, बेटा.. तुझ्याहून जास्त पावसाळे पाहिलेत.. माणसाची परीक्षा करावीच लागते.. पण हा पोरगा होनहार आहे. आणि हा म्हणाला ते खरेय.. त्या स्वामीची ॲक्टिंग.. टफ आहे ते.. पण माझे काम झाले.. (बबनला हाक मारत) या

जावईबापू.. असे लपू नका.. आम्ही तुम्हाला तिकडे आश्रमात आधीच भेटलो आहोत.. तेव्हा आता लपायचे कारण नाही..

*(बबन बाहेर येऊन उभा राहतो..)*

शहापूरकर: वा! बबनराव बोरकर.. आम्ही खूश आहोत तुमच्यावर..

*(बबन लाजत उभा राहतो..)*

शहापूरकर: पोरी तुला नाही कळणार.. एकुलत्या एका पोरीला वरणारा मुलगा चांगला तपासून घ्यायला नको..

*(शाल्मली लाजते..)*

शहापूरकर: लाजू नकोस.. उद्या तुम्हाला पोरगी झाली की तिच्या लग्नाच्यावेळी कळेल जिवाची घालमेल..

शाल्मली: हे हो काय पप्पा.. काहीतरीच तुमचे..

शहापूरकर: ठीक राहिले.. बबनराव.. ह्या शांतीची तयारी नाही दिसत लग्नाची.. तेव्हा सॉरी..

शाल्मली: पप्पा.. काहीतरीच..

शहापूरकर: काहीतरीच काय? नाही म्हणजे बळजबरी नाही.. हो की नाही बबनराव?

बबन: मी काय बोलू.. सॉरी.. आम्ही ते सारे स्वामीचे नाटक...

शहापूरकर: नो नॉट ॲट ऑल.. द्याट वॉज फन.. आणि आय ॲम थ्रिल्ड टू सी.. काय इमॅजिनेशन.. पोरं डोकेबाज आहेत..

बबन: सर.. ते मक्याचे क्रेडीट..

शहापूरकर: सर?

बबन: सॉरी सर.. सॉरी.. पप्पा.. ते मक्या म्हणजे अनिर्बंधस्वामीचे डोके.. लेखक आहे ना तो.. म्हणाला.. कधी कधी सत्य कल्पनेहूनही अधिक गंमतीदार असते..

शाल्मली: आणि रोचकही!

शहापूरकर: आय ॲम फॉण्ड ऑफ यू यंग बॉईज.. तुम्ही लोकं डोकं चालवता ना असे एकेक..

बबन: थँक्यू.. पप्पा.. मला वाटले आता माझी खैर नाही! पण..

शहापूरकर: तसेच नाही काही.. तुम्ही लोक फसवण्यासाठी नाटक करत असता तर नक्कीच रागावलो असतो.. पण आय नो.. यु ऑल आर जेन्युईन.. म्हणून.. आता माझी चिंता मिटली.. हिला पाठवली तुझ्याकडे की.. आणि मग बबनराव.. तुमची सुरू होईल लवकरच.. ह्या शांतीला झेलणे म्हणजे अशांतीस निमंत्रण.. खोटे नाही सांगत.. आता तुम्ही स्वतःच तयार झालात कुर्बान व्हायला तर..

शाल्मली: हे हो काय पप्पा.. मी रागावेन हां.. .

शहापूरकर: सॉरी.. सिक्रेट फोडल्याबद्दल ..

शाल्मली: पप्पा..

शहापूरकर: बबनराव.. आधी भाळलात आता सांभाळा.. आणि जन्मभर जप करा आता.. ॐ शांती शांती शांती:

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. नितीन मोरे यांचे हे १७ वे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर ( ९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (बारा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. वृषाली जोशी (पाच पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(तीन पुस्तके), मधू शिरगांवकर (दोन), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, ७ पुस्तके), विनीता देशपांडे (४ पुस्तके) असे अनेक लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

### आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

### दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।